| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १९ वा | शनिवार दिनांक २१ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- श्रीकृष्ण विठ्ठल काकडे, वय ५४ वर्षे, रा. चिखली ता. जि. धाराशिव यांचे व साक्षीदार यांचे बंद घराचे कलूप अज्ञात व्यक्तीने दि. १६.०३.२०२६ रोजी तोडून घरात प्रवेश करुन घरातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ५,००० असा एकुण ६७,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-श्रीकृष्ण काकडे यांनी दि.१९.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(५),३०५ गुन्हा नोंदवला आहे.

### घरासमोरील मोटारसायकलची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बबन महादेव लोहार, वय ४३ वर्षे, रा. वाघोली ता. कळंब जि.धाराशिव यांची अंदाजे ४०,००० ची मोटरसायकल ही दि. १६.०३.२०२६ रोजी वाघोली येथील घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बबन लोहार यांनी दि.१९.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

### गंभीर जखमी होवून मृत्यू

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे -मनोज उर्फ पिंटु साहेब गर्जे, वय ३५ वर्षे, रा.माळेगाव ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.१८.०३.२०२६ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान विलासपुर पांढरी येथुन माळेगाव येथे जात असताना मनोज गर्जे यानी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगयने व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकलवरुन पडुन गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-यशवंत साहेब गर्जे, वय ४० वर्षे, रा. माळेगाव ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.१९.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम २८१, १०६ (१) सह १८४, मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत अनुराधा रा. तुळजाई नगर एमआडीसी धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.१९.०३.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## वाढत्यातापमानाचाइशारा:उष्माघातापासून बचावासाठी आरोग्य विभागाचे आवाहन

धाराशिव (जिमाका) गेल्या काही दिवसांमध्ये तापमानात लक्षणीय वाढ होत असून या वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचे गंभीर परिणाम होऊ शकतात,असा इशारा देत नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

उष्माघात टाळण्यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी भरपूर पाणी पिणे,सुती व आरामदायी कपडे परिधान करणे आणि ताजे अन्न सेवन करूनच बाहेर पडणे आवश्यक आहे.बाहेर जाताना डोके झाकणे किंवा छत्रीचा वापर करावा.तसेच पाणी,ताक, ओ.आर.एस.द्रावण,लस्सी, लिंबूपाणी,आंबा पन्हे यांसारखी पेये सोबत ठेवावीत,असेही सांगण्यात आले आहे.

उष्माघाताची लक्षणे प्रौढ व लहान मुलांमध्ये वेगवेगळी दिसतात. प्रौढांमध्ये शरीराचे तापमान १०४ फॅरेनहाइट (४० अंश सेल्सिअस) पर्यंत वाढणे,तीव्र डोकेदुखी,स्नायू आखडणे,मळमळ,उलटीचा भास, चक्कर येणे,हृदयाचे ठोके वाढणे ही लक्षणे आढळतात.तर लहान मुलांमध्ये आहार न घेणे,चिडचिड, लघवी कमी होणे,डोळे व तोंड कोरडे पडणे,रक्तस्राव होणे यांसारखी लक्षणे दिसून येतात.त्यामुळे लहान मुलांना उन्हात खेळू देऊ नये,त्यांना गाडीत बंद ठेवू नये आणि डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरणे आवश्यक आहे.

उष्माघाताचा त्रास झाल्यास संबंधित व्यक्तीला तात्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे,पायाखाली उशी ठेवून आडवे झोपवावे आणि थंड पाण्याचे घोट द्यावेत.कपडे सैल करणे,पंख्याचा वापर करणे आणि डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे उपयुक्त ठरते.व्यक्ती बेशुद्ध असल्यास काहीही खायला-प्यायला देऊ नये आणि तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात नेऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा.तसेच उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीस मदत करताना थंड ठिकाणी हलवणे,शरीरावर पाणी मारणे व मोकळ्या हवेत ठेवणे आवश्यक आहे.बेशुद्ध,गोंधळलेली किंवा अत्याधिक घाम येणारी व्यक्ती आढळल्यास त्वरित १०८ किंवा १०२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.उष्णतेच्या लाटेकडे दुर्लक्ष न करता आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी व सुरक्षित राहावे,असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,धाराशिव यांनी केले आहे.

## ऑटोरिक्षा-टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणाला स्थगिती : इरादापत्र देण्याची प्रक्रिया थांबवली

धाराशिव दि.२० मार्च (जिमाका) राज्यातील विविध संघटनांकडून ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणाबाबत आक्षेप नोंदवत ते बंद करण्याची मागणी करण्यात आली होती.या पार्श्वभूमीवर ९ मार्च २०२६ रोजी परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

या बैठकीदरम्यान ऑटोरिक्षा / टॅक्सी परवान्यांच्या खुले धोरणास स्थगिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यभरात नवीन परवाने देण्याच्या प्रक्रियेत तात्पुरती अडथळा निर्माण होणार असून, संबंधित विभागांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने इरादापत्र देण्याचे कामही तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आले आहे.त्यामुळे नवीन परवाना प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना सध्या प्रतीक्षा करावी लागणार आहे.हा निर्णय प्रशासनिक पातळीवर अमलात आणण्यात येत असून, पुढील आदेश येईपर्यंत ही स्थगिती कायम राहणार आहे.या संदर्भात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी धाराशिव,श्री.हर्षल डाके यांनी माहिती दिली.

## ग्रामीण शिक्षणाचा झेंडा उंचावला नवोदय प्रवेशात जिल्हा परिषद शाळांचा दबदबा: ८० पैकी ६६ विद्यार्थ्यांची निवड

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश प्रक्रियेत यंदा जिल्हा परिषद शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.इयत्ता ६ वीसाठी उपलब्ध असलेल्या एकूण ८० जागांपैकी तब्बल ६६ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधील निवड झालेले आहेत. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातून ८० पैकी ७७ विद्यार्थ्यांची निवड झाली असून,हे ग्रामीण शिक्षणाच्या गुणवत्तेचे द्योतक मानले जात आहे.

तालुकानिहाय एकूण निकाल पुढीलप्रमाणे आहे - धाराशिव (२०), तुळजापूर (१८),कळंब (१३), उमरगा (०७),भूम (०७),लोहारा (०७),वाशी (०४) आणि परंडा (०४) असे एकूण ८० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.यामध्ये जिल्हा परिषद शाळांचा वाटा लक्षणीय असून, तालुकानिहाय जिल्हा परिषद शाळांमधील निवड पुढीलप्रमाणे आहे - धाराशिव तालुका २० पैकी १८,तुळजापूर १८ पैकी १६,कळंब १३ पैकी १२,उमरगा ७ पैकी ४,भूम ७ पैकी ४,लोहारा ७ पैकी ५,वाशी ४ पैकी २ तसेच परंडा ४ पैकी ४ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधून निवड झालेले आहेत.

मागील वर्षी जिल्हा परिषद शाळांमधून ६३ विद्यार्थ्यांची निवड झाली होती,तर यंदा हा आकडा वाढून ६६ वर पोहोचला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या कामगिरीत लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट होत आहे.विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची गोडी लागावी यासाठी धाराशिव जिल्हा परिषदने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा स्वनियोजित निधीतून जचठ शीटचा वापर करून दोन सराव परीक्षांचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून,परिणामी जिल्हा परिषद शाळांच्या कामगिरीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, उपशिक्षणाधिकारी कैलास पिकवणे यांनी विद्यार्थ्यांचे,शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले आहे.

सर्वांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षण विभागातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केल्याचे नमूद करण्यात आले आहे.या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक क्षमता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जाणीव अधोरेखित झाली असून, भविष्यातही अशाच प्रकारे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे.

## आर्थिक वर्षअखेर दस्तनोंदणीसाठी विशेष सुविधा ; सुट्टीच्या दिवशीही निबंधक कार्यालये राहणार सुरू

धाराशिव (जिमाका) आर्थिक वर्ष संपत येत असून नूतन वर्षानिमित्त नागरिकांचा मालमत्ता खरेदीकडे वाढता कल लक्षात घेता दस्तनोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर तसेच इष्टांक पूर्तीच्या दृष्टीने प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.दि.२६ मार्च २०२६,दि.२८ मार्च २०२६,दि.२९ मार्च २०२६ व दि.३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे.

त्यामुळे नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही दस्तनोंदणीची सुविधा उपलब्ध होणार असून व्यवहारांमध्ये सुलभता येणार आहे. तसेच या सुट्ट्यांच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी आणि अभिनिर्णय व कमी पडलेले मुद्रांक शुल्क इत्यादी कामे विहीत वेळेत पूर्ण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयही कार्यरत ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.

या निर्णयामुळे दस्तनोंदणी प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार असून नागरिकांना वेळेची बचत होणार आहे.

### मोटारसायकलवरुन आलेल्या तिघांनी महिलेच्या गळ्यामील सोन्याचे दागिणे हिसकावले

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- मिराबाई विष्णु गोरे, वय ४५ वर्षे, रा. इंदापूर ता. वाशी जि. धाराशिव या दि.१९.०३.२०२६ रोजी इंदापुर शिवारात इंदापुर ते वाशी जाणारे रस्त्यावरील पुलावजळ शेतात जात असताना मोटरसायकलवर आलेल्या तीन अनोळखी इसमांनी मिराबाई यांचे गळ्यातील चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण १६,००० किंमतीचे हिसकावुन घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- मिराबाई गोरे यांनी दि.१९.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२), ३(५) गुन्हा नोंदवला आहे.

## मतदार यादी विशेष पुनरिक्षणासाठी जिल्ह्यातील संगणक लॅब अधिग्रहित

धाराशिव (जिमाका) भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लवकरच मतदार यादींचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (Special Intensive Revision) राज्यात सुरू करण्याची घोषणा होणार आहे. त्यानुसार मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून मतदार यादींच्या पुनरिक्षण पूर्व उपक्रमाची तयारीबाबत लेखी निर्देश दिलेले आहेत.त्यानुसार मतदार यादीमध्ये असलेल्या मतदारांचे सन २००२ रोजीच्या मतदार यादीतील मतदारांशी मतदार मॅपिंग करणे, अस्पष्ट (Blur Photo) मतदारांचे नवीन रंगीत फोटो गोळा करून अद्यावत करणे,तसेच DSE च्या नोंदीची पडताळणी करून त्यावर योग्य ती कार्यवाही करणे इत्यादी कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातील २४०-उमरगा,२४१-तुळजापूर, २४२-उस्मानाबाद व २४३-परंडा विधानसभा मतदारसंघातील सर्व BLO व BLO Supervisor यांनी मतदारांचे मॅपिंग करणे,अस्पष्ट असलेले (Blur Photo) फोटो गोळा करून अद्यावत करणे,तसेच DSE च्या नोंदीची पडताळणी करणे या कामकाजासाठी दिनांक २०.०३.२०२६ ते २१.०३.२०२६ या कालावधीत पूर्णवेळ सेवा अधिग्रहित केली असल्याने SIR संदर्भातील संगणकीय कामकाज करण्यासाठी तालुकानिहाय औद्योगिक संस्था / महाविद्यालयाच्या संगणक लॅब इंटरनेट सुविधेसह तसेच संगणक हाताळणारे ५ तांत्रिक कर्मचारी यांची सेवा या आदेशान्वये दिनांक २०.०३.२०२६ ते ३१.०३.२०२६ या कालावधीत करिता खालील प्रमाणे अधिग्रहित करण्यात येत आहेत.

यामध्ये **धाराशिव** तालुक्यासाठी शासकीय तंत्रनिकेतन,धाराशिव; तुळजापूर तालुक्यासाठी श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय कंप्युटर लॅब, **तुळजापूर;** लोहारा तालुक्यासाठी श्री स्वामी रामानंद तीर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**लोहारा;** उमरगा तालुक्यासाठी इंदिरा वेदप्रकाश शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**उमरगा; कळंब** तालुक्यासाठी संत गोरखाबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**कळंब; वाशी** तालुक्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**वाशी;** भूम तालुक्यासाठी आचार्य विद्यासागरजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,**भूम;** तसेच परंडा तालुक्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,परंडा या संस्थांचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्यामुळे वरील औद्योगिक प्रशिक्षण संस्था / महाविद्यालयाच्या संगणक लॅब,इंटरनेट सुविधेसह दिनांक २०.०३.२०२६ ते ३१.०३.२०२६ या कालावधीत सेवा अधिग्रहित करण्यात येत असून,संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून मतदार यादी विशेष पुनरिक्षणाची प्रक्रिया वेळेत व अचूकरीत्या पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हा आढावा बैठक

धाराशिव (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने धाराशिव जिल्ह्यातील पक्ष संघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत पक्षाच्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी धोरणांवर चर्चा करण्यात येणार आहे.

ही बैठक पक्षाचे जिल्हा निरीक्षक रवींद्रजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असून, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध फ्रंटल सेलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

सदर आढावा बैठक रविवार, दिनांक २२ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत पक्ष संघटन वाढ, आगामी निवडणुकांची तयारी, तसेच स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती मिळाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच फ्रंटल सेलच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## श्री शांतेश्वर मठाच्या १६२ एकर शेतीचा गुढी पाडव्यादिवशी यशस्वी लिलाव



आलूर (रामलिंग पुराणे) - आलूर येथील श्री शांतेश्वर संस्थान मठाच्या १६२ एकर शेतीचा एक वर्षासाठी भाडे तत्वावर लिलाव गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहात पार पडला. या लिलाव सोहळ्यास मठाधिपती सुशांत शिवाचार्य महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मठाच्या विविध मळे व शेतजमिनींचा लिलाव पुढीलप्रमाणे संपन्न झाला: दणुरे मळा (सर्वे नं. ३३४ गट नं. ८६४- ७ एकर) - २,३३,००० (संतोष पाटील), तुकशेट्टी मळा (सर्वे नं. १९४ गट नं. ५९०- १६ एकर) - ७,५०,००० (कलप्पा राठोड), मठाचा मळा (सर्वे नं. ८६/१ गट नं. ५७८, ८६/२ गट नं. १८८- १९ एकर) - ५,०५,००० (नितीन बोळदे), सडक पट्टी (सर्वे नं. ८६/३ गट नं. १९५- २८ एकर) - ७,१२,००० (नागेश गुंडगे), सड्डु शेत (सर्वे नं. ६६ गट नं. १६६- ५२ एकर) - ११,१५,००० (योगेश स्वामी), इमंती शेत (सर्वे नं. १२२ गट नं. ३४६- ३२ एकर) - ९,५२,००० (शांतप्पा पाटील) आणि अचलेर शेत (८ एकर) - ५३,००० (सुरेश गोपणे) अशा प्रकारे लिलाव करण्यात आला.

या लिलाव प्रक्रियेत आलूरचे उपसरपंच जितेंद्र पोतदार, सुभाष खजुरे, शांतप्पा पाटील आणि बंडू सिंह चव्हाण यांनी कार्यवाहक म्हणून काम पाहिले.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत मैनोद्दीन रा. फकीरा नगर वैराग नाका धाराशिव जि. धाराशिव यांनी दि. १७.०३.२०२६ रोजी वासु वैराग रोड सय्यदनगर धाराशिव येथे लिलॅन्ड कंपनीच्या चारचाकी वाहन मध्ये गोवंशीय जातीचे एक जर्शी गाय, गावरान गायी वाहनासह एकुण ४,१५,०००किंमतीचे गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन ठेवलेले धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(बी), सह ५(अ) पशु संरक्षण अधिनियम अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अमित देशमुख यांचा वाढदिवस

लातूर शहराचे आमदार व माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. अमित देशमुख यांना सर्वजन भैय्या म्हणतात. भैया म्हणजे आपल्या ग्रामीण भाषेत भाऊ! भाऊ हा घराचा कर्ता असतो. देशाचे लोकप्रिय नेते माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांचे चिरंजीव. विलासराव देशमुख यांच्या निधनाने लातूरकरात एक पोकली निर्माण झाली होती. ती विकासाची पोकळी, कोण व कसे भरून काढेल ही चिंता सतावत होती. दिवंगत विलासराव देशमुख यांच्या ह्याती मध्ये अमित देशमुख तयार होत होते. त्यांना वडीलांकडून राजकारणाचा सहवास कमी लाभला. असे असले तरी त्यांनी वडीलांचा वारसा जोपासला. वडीलापेक्षा वेगळे काही करण्याचा प्रयत्न केला त्यात ते यशस्वी झाले. जसे लातूर शहर मतदार संघातून उभे राहातात तसे ते निवडूण येत आहेत. राज्यात मंत्रीपद सांभाळत त्यांनी लातूरचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. मुळात देशमुख परिवार लोकप्रिय आहे. ते कोणाला त्रास देत नाहीत. आपल्या हातून जेवढे काम करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न करतात. इतरात व त्यांच्यात हाच फरक आहे. इतरासारखे कामासाठी सतावत नाहीत. जेवढे जनतेची कामे करता येतील तेवढे करण्याचा प्रयत्न करतात. कामे करतात. त्यांनी सांगितलेले काम अधिकारी डावलत नाहीत. जसे शंभर टक्के दिवंगत लोकप्रिय विलासरावजी देशमुख मानत होते तेवढे ते जनतेसोबत नसले तरी जनता व त्यांच्यात दुरावा नाही हे मान्यच केले पाहिजे. जनतेला कामे झाली नाहीत तरी वाईट वाटत नाही मात्र साहेबांनी प्रयत्न केला हा जो आनंद आहे हा लाख मोलाचा आहे. त्यामुळे अमित देशमुख यांच्यात वडीलासारखी काम करण्याची शैली आहे. त्यामुळे ते लातूरच्या राजकारणात यशस्वी होतात. महानगरपालिकेत त्यांनी सत्ता खेचून आणली. जिल्हा परिषदेत सत्ता मिळविता आली नसली तरी अनेक सदस्य निवडूण आणता आले. जिल्ह्यातून उमेदवार जिप मध्ये निवडूण आणणे कठिण होते. जिल्ह्यात एकमेव आमदार हे काँग्रेसचे आहेत. बाकी तीन भाजपा व दोन राष्ट्रवादी अजित पवार यांच्या पक्षाचे आहे. काँग्रेसचे भक्कम असे पाठबळ नसताना त्यांनी यशस्वी काम केले. वडीलांचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान उंचविण्यासाठी साखर कारखाने निर्माण केले. ग्रामीण भागाचा विकास केला. हाती सत्ता असणे व नसणे हे राजकारणात महत्त्वाचे असते. राज्यात व केंद्रात भाजपाची सत्ता असताना त्यांची विकासाची घोडदौड चालूच आहे. विकासासाठी निधी खेचून आणणे आवघड काम असताना ते जिल्ह्याचा विकास साधतात. वास्तविक अमित देशमुख यांनी वाढदिवसानिमित्त नवा उपक्रम राबविण्याची गरज आहे. तो उपक्रम म्हणजे जनतेशी थेट संपर्क! काम करावेत असे नाही. कामे होतीलच असे नाही. परंतु जनतेसाठी जे प्रयत्न केले याला महत्त्व आहे. जो पर्यंत लातूर आहे तो पर्यंत देशमुखांचे नाव राहाणार आहे यात शंका घेण्याचे कारण नाही. जनतेला विकास हवा आहे. लातूरचे नाव गाजावे ही अपेक्षा आहे. आमच्या मुलास नोकरी लावावी किंवा कारखान्यावर कामावर ठेवावे ही अपेक्षा नाही तर तर शहराचा विकास चौफेर झाला पाहिजे ही प्रामाणिक भावना आहे. नुकतीच महानगरपालिका विरोधकांच्या नाकावर टिच्चून आपल्या ताब्यात दिली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या माध्यमातून जनतेची कामे होणे अपेक्षित आहेत. अजून नगरसेवकांचे लक्ष दिले नाही काही दिवसात देतील त्यानंतर तरी जनतेची कामे होण्याची तंबी देणे अपेक्षित आहे. जनतेकडून मोठी अपेक्षा नाही. वेळवर पाणी, वीज, चांगले रस्ते व स्वच्छता अपेक्षित आहेत. अतिक्रमणास आळा घालणे आवघड आहे त्यापेक्षा चौक मोठे करणे दिव्य काम आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापुतळ्या भोवतीचा अतिक्रमणाचा भाग मोकळा करणे अशक्य आहे. जीव मुठीत घेवुन चालावे लागते. कधी कोण उडवेल हे सांगात येत नाही. जीव मुठीत घेवून चालावे लागते ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे लातूर अतिक्रमण मुक्त करणे आवघड आहे. तरी पर्यायी मार्गावर विकासनेते विलासराव देशमुख मार्ग व लोकमान्य टिळक मार्ग जो तळ्यातील महादेवचा मार्ग व्यवस्थित करावा लागेल. तेथेही रस्त्यावर चालणे आवघड आहे. देशमुख परिवारांवर लातूरकरांचे उदंड प्रेम आहे. आशिर्वाद आहे यात दुमत नाही. तसे देशमुखांनी कोणाचे काय वाईट केले? अशी चर्चा हात असते ती योग्यच आहे. जे काही लातूरकरासाठी करावयास हवे ते त्यांनी केले व करीत आहेत. त्यातच जनतेकडून सतत सुचना मागविणे आवश्यक आहे. आमदार देशमुख यांनी एक लातूर विकासासाठी समिती तयार करणे अपेखित आहे. यात मान्यवरांचा समावेश असावा. डॉक्टर, वकील, इंजिनिअर, बिल्डर, सीए व पत्रकार यांचा समावेश असावा. त्यांचा सतत जनतेशी संपर्कअसतो, त्यांच्याकडे जनता गऱ्हाणे मांडतात. त्यांनी जनता व आमदार यांच्यातील दुवा बनावा. आडीआडचणीच्या प्रसंगी आमदारांनी सोडवणुक करावी. त्यामुळे लोकप्रियतेत भर पडणार आहे. मुळात आपल्याकडील जनतेच्या समस्या मोठ्या नाहीत हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. जनतेच्या प्रश्नाच्या सोडवणुकीकडे लक्ष दिल्यास विरोधकांचा शिरकाव होणार नाही. टिकाव लागणार आहे. सध्याला देशमुख परिवारासाठी वातावरण योग्य व समाधानाचे आहे. विरोधकात तशी ताकद अजून आली नाही. ते जर सक्षम झाले व जनतेचा मोठा संपर्क वाढला तर आगामी काळ कठिण होवू शकतो. सध्याला विरोधक कसे आहेत. कोणत्या चालीचे आहेत. कसे जुळवुन घेतात हे लातूरकरांना माहिती आहे. त्यामुळे आमदारांनी थोडी तसदी घेणे अपेक्षित आहे. जो जनतेशी दुरावा निर्माण होत आहे ती दुरी कमी झाली पाहिजे. मोठ्या-धनी परिवाराशी संबंध जोडणे, त्यांच्यापरिवारातील कार्यक्रम, लग्नविवाह प्रसंगी उपस्थिती ही जनतेच्या मनाला खटकत आहे. या बाबत वाढदिवसानिमित्त विचार करणे अपेक्षित आहे. देशमुख परिवाराचा लातूरकरांना मोठा आधार आहे. त्यामुळे देशमुख परिवारांनी चिंता न करता लातूरचा विकास जोमाने करावा. आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जडे, लातूर समाचार परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा! त्यांना निरोगी, उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वराजवळ प्रार्थना....

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची वाटचाल: समर्थ नेतृत्वाचा आणि आधुनिक विकासाचा प्रवास

**''लोकनेते विलासराव देशमुख यांचा माणसं जोडण्याचा समृद्ध वारसा आणि माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची प्रशासकीय शिस्त, लोकसंपर्क, उपक्रमशीलता व तंत्रज्ञानाची आधुनिक जोड असलेली कार्यपध्दती हाच लातूरच्या प्रगतीचा खरा मंत्र आहे.'' आज २१ मार्च रोजी त्यांचा वाढदिवस आहे, त्यांना वाढदिवसाच्या मन:पुर्वक शुभेच्छा..!**

महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर एक सुसंस्कृत, अभ्यासू आणि तंत्रस्नेही नेतृत्व म्हणून माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.. गेल्या २५ वर्षांतील त्यांचा प्रवास हा केवळ सत्तेचा सोपान नसून, तो कृषी, सहकार, आरोग्यसेवा, तंत्रज्ञान, प्रशासकीय शिस्त आणि जनसेवेचा एक अनोखा संगम आहे. वडिलांचा वारसा सांगतानाच, स्वतःच्या कर्तृत्वाने राजकारणात एक आश्वासक स्थान निर्माण करणारे अमित देशमुख आज राज्याच्या राजकारणातील एक प्रभावी व्यक्तिमत्व ठरले आहेत.

माजी मंत्री, अमित विलासराव देशमुख यांच्या राजकीय प्रवासाची खऱ्या अर्थाने सुरुवात सन १९९७ मध्ये युवक काँग्रेसच्या माध्यमातून झाली. त्यांनी केवळ लातूरपुरते स्वतःला मर्यादित न ठेवता, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक म्हणून कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गोवा या राज्यांमध्ये पक्ष संघटना बळकट करण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून सन २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग चार निवडणुकांत त्यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवून जनतेचा अढळ विश्वास संपादन केला आहे. त्यांच्या संघटनात्मक कौशल्याची पहिली मोठी प्रचिती २०१२ च्या लातूर महानगरपालिका निवडणुकीत आली. ७० पैकी ४९ जागांवर काँग्रेसला ऐतिहासिक बहुमत मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. नुकत्याच झालेल्या लातूर शहर महानगरपालीका निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली ७० पैकी काँग्रेस वंचीत आघाडीला ४७ जागा मिळून सत्ता हाती आली आहे.

माजी मंत्री, अमित विलासराव देशमुख यांना जेंव्हा जेंव्हा मंत्रीमंडळात जबाबदारी मिळाली, तेंव्हा त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कारकिर्दीचे दोन महत्त्वाचे टप्पे राज्याच्या विकासासाठी दिशादर्शक ठरले:

राज्यमंत्री (२०१४): पर्यटन आणि ऊर्जा विभागाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राला मोठी चालना दिली. पवन ऊर्जेची क्षमता वाढवण्यासाठी राज्यात ३९९ वारा परिमापन केंद्रे उभारण्याचा धाडसी निर्णय त्यांच्या काळात घेण्यात आला.



कॅबिनेट मंत्री (२०१९-२०२२): वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून त्यांनी कोरोनाच्या जागतिक महासंकटात आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी युद्धपातळीवर काम केले. लातूरचे पालकमंत्री म्हणून त्यांनी अवघ्या १०० दिवसांत १००० कोटींचा निधी जिल्ह्यासाठी खेचून आणला. यामध्ये विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी १०० कोटींची अद्ययावत बाह्य रुग्ण () इमारत आणि २०० खाटांचे स्वतंत्र स्त्रीरोग व बाल रुग्णालय मंजूर करून लातूरला मेडिकल हब बनवण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले.

वैद्यकीय शिक्षण विभागातील क्रांती वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून अमितजींनी कोरोना विरुद्धच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली सुरुवातीला राज्यात फक्त ३ प्रयोगशाळा होत्या, त्या १००० पर्यंत वाढवल्या. ६ कोटी लोकांची तपासणी आणि २० समर्पित रुग्णालयांची उभारणी केली. राज्यात ८० ऑक्सिजन प्लांट (४० लिक्विड आणि ४० पीएसए) तातडीने उभारले. ८ हजार ऑक्सिजन आणि ३ हजार व्हेंटिलेटर बेड निर्माण केले. ३ हजार रुग्णांवर मोफत उपचार आणि २५०० यशस्वी शस्त्रक्रिया केल्या.

वैद्यकीय प्रवेशातील जाचक ७०:३० कोटा पद्धत रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, ज्याचा सर्वाधिक फायदा मराठवाडा आणि विदर्भातील गुणवंत विद्यार्थ्यांना झाला. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन पहिल्या टप्प्यात ८ आणि दुसऱ्या टप्प्यात ५ नवीन महाविद्यालयांना मंजुरी दिली.

माजी मंत्री, अमित विलासराव देशमुखनी केमिकल इंजिनिअरिंगच्या ज्ञानाचा उपयोग सहकार क्षेत्रात अत्यंत कल्पकतेने केला आहे. विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा आदर्श घेवून त्यांनी उभारणी केलेले विलास साखर कारखाना, टवेन्टिवन शुगर्स हे कारखाने आज राज्यासाठी मॉडेल ठरले आहेत.

यांत्रिकीकरण : ऊसशेतीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ऊ स ला ग व ड , आंतरमशागत आणि ऊस तोडणी मजुरांच्या टंचाईवर मात करण्यासाठी त्यांनी यांत्रिकीकरण यशस्वीपणे राबवले, ज्यामुळे साखर उद्योगात मोठी क्रांती झाली.

सह-वीज निर्मिती: उभारणी केलेल्या कारखान्यांमध्ये उपपदार्थ प्रकल्पाची सह-वीज निर्मिती प्रकल्प आणि इथेनॉल प्रकल्पाची यशस्वी उभारणी करून त्यांनी सहकाराला उर्जेची जोड दिली.

राष्ट्रीय सन्मान: त्यांच्या उत्कृष्ट आर्थिक आणि तांत्रिक नियोजनामुळे विलास कारखान्याला आजवर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील ३७ पुरस्कार मिळाले आहेत.

केवळ राजकारण न करता, अमितजींनी पर्यावरणाशी आपली बांधिलकी नेहमीच जपली आहे. ज्या ज्या संस्था उभा केल्या तेथे पर्यावरणपूरक व संवर्धनाचे वातावरण ठेवले आहे. या शिवाय वृक्षारोपणाची चळवळ आणि पर्यावरण संदर्भात उपक्रम राबवून त्यांनी आपल्या निसर्गप्रेमाची साक्ष दिली आहे.

बदलत्या काळाची पावले ओळखून ते सोशल मीडियाच्या माध्यमातून (वाटसअप, फ ेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम) थेट जनतेशी संवाद साधतात. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी विशेष हेल्पलाईन आणि व्हॉट्सॲप सुविधा उपलब्ध करून दिली आहे, जी त्यांच्या पारदर्शक कामकाजाचे प्रतीक आहे.

मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र विधानसभा काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी झालेली त्यांची निवड, हे त्यांच्या वाढत्या राजकीय प्रभावाचे आणि पक्षनिष्ठेचे प्रतीक आहे. पक्षातील अनुभवी नेत्यांचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचे प्रेम मिळवण्यात ते यशस्वी झाले आहेत.

लोकनेते विलासरावजींची माणसं जोडण्याची कला आणि अमितजींची प्रशासकीय शिस्त व आधुनिक दृष्टी यांचा हा मेळ लातूरला भविष्यात सहकार, कृषी, वैद्यकीय आणि औद्योगिक हब म्हणून जागतिक नकाशावर नेण्यासाठी सज्ज आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात एक लोकप्रिय, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्व म्हणून अमित देशमुख यांचे स्थान आता अधिक प्रबळ झाले आहे.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख हे केवळ एका मोठ्या नेत्याचे पुत्र म्हणून नव्हे, तर आपल्या कर्तृत्वाने आणि विकासाच्या ध्येयाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक आश्वासक नेतृत्व म्हणून ठामपणे उभे आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून अशीच लोकसेवा घडो, हीच सदिच्छा!



**लेखक : राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

# देशासह राज्यातील वनक्षेत्रातताची घट अत्यंत चिंताजनक

जगातील वन क्षेत्र संरक्षित रहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभाने २०१२ ला २१ मार्च हा दिवस ''आंतरराष्ट्रीय वन दिवस'' साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासुन जगात २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे.आज निसर्गावर सर्वंच काही अवलंबून आहे.आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते.वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतः च्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र आहे म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे.आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे.देहरादून येथील ''फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया'' या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो. वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा,या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणणा होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे.इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी राज्य सरकारने स्विकारली पाहिजे. वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की,गावात, शहरात, कोणाच्या घरात,रोडवर हिंसक प्राणी(वाघ, बिबट्या,अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार , विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने ''स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४ '' हा अहवाल सादर केला आहे.त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# एचपीव्ही लसीकरण मोहीम : मुलींच्या आरोग्य रक्षणासाठी महत्त्वाचे पाऊल

महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे, यासाठी एचपीव्ही (Human Papilloma virus) लसीकरण अत्यंत प्रभावी मानले जाते. याच पार्श्वभूमिवर राज्य शासनातर्फे १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी विशेष एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. जागतिक महिला दिनी या मोहिमेची सुरुवात करण्यात आली असून, ती आगामी ९० दिवस चालणार आहे. या मोहिमेमुळे किशोरवयीन मुलींना भविष्यात होणाऱ्या गंभीर आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे. जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ व त्यांची संपूर्ण आरोग्य यंत्रणा या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज आहे.

**पात्र लाभार्थी**

या मोहिमेत १४ वर्षे पूर्ण झालेल्या आणि १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. मोहीम सुरू झाल्यानंतर पुढील ९० दिवसांच्या कालावधीत १५ वर्षे पूर्ण होणाऱ्या मुलीदेखील या मोहिमेस पात्र राहतील. साधारणपणे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे १ टक्का मुली या मोहिमेच्या लाभार्थी असतील, असा अंदाज आहे.

**कोणती लस दिली जाणार?**

या मोहिमेत गार्डसिल ४ (Quadrivalent HPV Vaccine) ही लस वापरण्यात येणार आहे. ही लस ०.५ मि.ली. प्रमाणात स्नायूमध्ये (Intramuscular) डाव्या हाताच्या वरच्या भागात दिली जाते. या मोहिमेत लाभार्थींना एकच डोस देण्यात येईल. लसीकरण झाल्यानंतर लाभार्थीच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेनने खूण करण्यात येईल.

**लसीची साठवण व सुरक्षितता**

लस +२ष्टण ते +८ष्टण तापमानात कोल्ड चेन प्रणालीद्वारे सुरक्षितपणे साठवली जाईल. लस पूर्णपणे सुरक्षित असून काही वेळा सौम्य दुष्परिणाम जसे की हलका ताप, सूज किंवा वेदना जाणवू शकतात. हे दुष्परिणाम बहुधा दोन दिवसांत आपोआप कमी होतात आणि शरीराच्या रोगप्रतिकारक प्रतिसादाचा नैसर्गिक भाग असतात.

**लसीकरणाची ठिकाणे**

लसीकरण सत्रे विविध शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयोजित केली जात आहेत. त्यामध्ये आयुष्मान आरोग्य मंदिर (प्राथमिक आरोग्य केंद्र ), ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांचा सम ावेश असून, या ठिकाणी कोल्ड चेन सुविधा, इंटरनेट, संगणक तसेच AEFI (Adverse Event Following Immunization) व्यवस्थापनासाठी किमान एमबीबीएस पदवीधारक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असतील. लसीकरण सत्रे सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात येतील.

**डिजिटल नोंदणी**

सर्व लाभार्थींची नोंदणी व लसीकरणाची माहिती ळ-ऍ या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदविण्यात येईल. लाभार्थी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने पूर्वनोंदणी करून अपॉईंटमेंट घेऊ शकतात किंवा थेट येऊन नोंदणी करू शकतात. लसीकरणानंतर प्रमाणपत्र देखील पोर्टलवर उपलब्ध होईल.

**पालकांची संमती आवश्यक**

एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक असून मुलींच्या लसीकरणापूर्वी पालकांची संमती घेणे अनिवार्य आहे. ही संम ती पोर्टलवर डिजिटल पद्धतीने किंवा इंटरनेट उपलब्ध नसल्यास निर्धारित नमुन्यात हार्ड कॉपीवर घेण्यात येईल.

**हेल्पलाईन सुविधा**

लसीकरण किंवा दुष्परिणामांबाबत काही शंका असल्यास १०४ हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येईल. लसीकरण प्रमाणपत्रावर जवळच्या २४x७ व्यवस्थापन केंद्राचा पत्ता व हेल्पलाईन क्रमांक देखील नमूद असेल.

**मोहिमेचा कालावधी**

ही मोहीम ९० दिवस (तीन महिने) राबविण्यात येणार असून त्यानंतर एचपीव्ही लसीचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

एकूणच एचपीव्ही लसीकरण मोहीम ही मुलींच्या दीर्घकालीन आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पालकांनी या मोहिमेबाबत जागरूक राहून पात्र मुलींना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

**संकलन – संप्रदा बीडकर**
**जिल्हा माहिती अधिकारी, सांगली**

---------------------

# फक्त 'या' टिप्स वापरुन काही तासांतच घरीच तयार करा 'दही'

उन्हाळा असो किंवा कडक हिवाळा, अनेकांना जेवणासोबत दही खाणं आवडते. बहुतेक लोक खरेदी केलेल्या दह्यापेक्षा घरी बनवलेले दही खाणं पसंत करतात. उन्हाळ्यात दही सहज बसते, परंतु हिवाळ्यात थंड तापमान दुधामधील बॅक्टेरिया सक्रिय होण्यापासून रोखते, ज्यामुळे दही बसणे कठीण होते. म्हणून, जर तुम्हाला हिवाळ्यात स्वादिष्ट, घट्ट दही बनवायचे असेल, तर या टिप्स वापरून पहा. ती पद्ध कोणती ते जाणून घेऊया.

दही बनवण्याची ही योग्य पद्धत आहे: एका भांड्यात दूध चांगले उकळवा. नंतर ते थंड होईपर्यंत किंवा कोमट होईपर्यंत बाजूला ठेवा. त्यात दोन चमचे दही घाला आणि मिक्स करा. जर तुम्ही भांडे ५ ते ६ तास तसेच ठेवलं तर दही स्थिर होईल. सहसा, दही अशा प्रकारे सहजपणे स्थिर होते, परंतु हिवाळ्यात ते शक्य नसते, म्हणून दही थंडीत ठेवताना या गोष्टी लक्षात ठेवा...

साधारणपणे, दही स्थिर होण्यासाठी खोलीचे तापमान ३७ ते ४५ अंशांच्या दरम्यान असणं आवश्यक आहे. मात्र, हिवाळ्यात, तापमान या पातळीपर्यंत पोहोचत नाही. म्हणून, ती उष्णता निर्माण करण्यासाठी आपल्याला बाहेरील वातावरणावर अवलंबून राहावे लागेल.

दही बनवण्यासाठी, दूध चांगले उकळवा आणि नंतर ते कोमट होऊ द्या. दुधात दोन चमचे स्टार्टर कल्चर घाला आणि न ढवळता, डबा झाकून ठेवा आणि ८ ते १० तास उबदार जागी ठेवा.

जर तापमान खूप कमी असेल तर दही थंडीपासून वाचवण्यासाठी डब्यात गरम कापड किंवा जाड कापड गुंडाळा. तसंच, हवा आत जाऊ नये म्हणून झाकण बंद करा. स्टार्टर कल्चर खूप जुने नाही याची खात्री करा, कारण यामुळे दही आंबट होते.

हिवाळ्यात, डबा थंड हवेपासून दूर उबदार ठिकाणी ठेवावा. तरच दही घट्ट होईल.

हिवाळ्यात, तुमचे ओव्हन १८० अंशांवर एक किंवा दोन मिनिटे प्रीहीट करा. नंतर, दही असलेले कंटेनर ओव्हनमध्ये ६ ते ७ तास किंवा रात्रभर ठेवा. यामुळे सकाळपर्यंत दही व्यवस्थित तयार होईल.

जर तुम्ही स्वयंपाकघरात तांदळाच्या डब्यात दह्याचा डबा ठेवला तर तो उबदार राहातो आणि दही स्थिर होते. परंतु डबा काळजीपूर्वक झाकून ठेवा.

त्याचप्रमाणे, दही थर्माकोलच्या डब्यात ठेवल्याने ते थोडे गरम राहते. यामुळे दही घट्ट होण्यास मदत होते. शिवाय, दही इन्सुलेटेड डब्यात ठेवणे देखील चांगली कल्पना आहे.

आभासी जगातली माहितीच फक्त फेकफ असते असं नाहीये, माणसं ही फेक असतात, माणसांच्या प्रतिमा, त्यांचे शब्द, त्यांनी वापरलेले इमोजी या सगळ्या गोष्टी फेकफ असू शकतात. पण हे शोधण्यासाठी, समजून घेण्यासाठी आपल्याकडे वेळ आहे का?

मुलांच्या मोबाईलचं करायचं काय?

मुक्ता चैतन्य, समाजमाध्यम अभ्यासक

मुलांच्या मोबाईलचं करायचं काय?फ – हा प्रश्न पालक, शिक्षक आणि मोठ्यांच्या जगाला पडलेला असला तरी खरंतर हा प्रश्न माणसांच्या हातातल्या मोबाईलचं करायचं काय?फ असा आहे. जन्माला आल्यापासून डोळ्यासमोर असणाऱ्या मोबाईलचे बरेवाईट परिणाम आता मोठ्या प्रमाणावर दिसायला लागले आ-हेत. आपण डिजिटल माध्यमसाक्षर नाही याची जाणीव विविध वयोगटातल्या अनेकांना होऊ लागली आहे. सेक्सटॉर्शनपासून आर्थिक फसवणुकीपर्यंत अनेक गुन्हे दाराशी येऊन उभे राहिले आहेत. नव्या पिढीचा संवाद, प्रेम, डेटिंग, बुलिंग, शॉपिंग, मनोरंजन सगळंच ऑनलाईन जगाशी जोडलं गेलेलं आहे. त्यामुळे या हायब्रीड आयुष्याचे परिणाम निरनिराळ्या स्तरांवर आता दिसायला लागले आहेत.

डिजिटल जगातून अनेक मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होताना दिसतायत. मग त्यात समाजमाध्यम नैराश्य (सोशल मीडिया डिप्रेशन) असो, फोमो (फिअर ऑफ मिसिंग आऊट) असो नाहीतर स्व- प्रतिमेचे प्रश्न असोत. माणसांमध्ये वर्तणुकीय बदलही मोठ्या प्रमाणावर होऊ

आपलं लक्षच नाहीये.

हेही वाचा क्शरश्रींह डशिलळरश्र: पावसाळ्याच्या सुरुवातीस आरोग्य बिघडण्याचे प्रमाण वर्षात सर्वाधिक का असते?

बिंज वॉचिंग सारख्या ग्लॅमरस शब्दाला घट्ट चिकटलेला व्यसनफ हा शब्द आपल्याला दिसत नाहीये. सतत मोबाईल चेक करण्याच्या सवयीमुळे कशावरच लक्ष केंद्रित न होणं हा एक सार्वजनिक त्रास उद्भवला आहे ज्याची, मुलं आणि तरुणाई पहिली शिकार आहेत. आपल्याला तंत्रज्ञानाला वळसा देऊन गोष्टी कशा करायच्या हे लक्षात येईनासे झाले आहे. इयरफोन्समधून कानात वाजणारे निरनिराळे आवाज, डोळ्यासमोर सतत हलणारी चित्र या सगळ्यात भवतालचं भान हे अत्यंत मूलभूत मानवी लक्षण आपण हरवत चाललो आहोत. आपल्या आजूबाजूला, शेजारी काय घडतंय हे आपल्या लक्षात येत नाही इतकी बधिरावस्था पाहायला मिळते आहे.२४ तास बारामहिने, दिवसरात्र हातात फोन असणं, आभासी जगात फिरण्याची सोय असणं, कामापासून भावनांपर्यंत अनेक गोष्टींच्या जोडण्या या फक्त आभासी जगाशी करणं, हायब्रीड जगण्याची सवय लावत असताना माध्यम शिक्षणाकडे पाठ फिरवणं या सगळ्यातून निर्माण होणारा, झालेला, होऊ घातलेला माणूस निराळा असणार



# मुलांना मोबाईलचं करायचं तरी काय?

लागले आहेत. ट्रोलिंग हा कालपर्यंत फक्त मोठ्यांच्या जगाशी संबंधित विषय आता तरुणाईपर्यंत जाऊन पोहोचलेला आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन जगाची आपल्याही नकळत आपण सरमिसळ करतो आहोत. सगळ्यात गमतीचा भाग असा की खासगी आणि जाहीर यातली सीमारेषा आपणच झपाट्याने पुसायला लागलो आहोत. कालपर्यंत आपण जे काही डायरीत लिहीत होतो किंवा अगदी जवळच्या माणसांना मन मोकळं करायचं म्हणून सांगत होतो ते आता आपण जाहीर व्यासपीठावर मोठ्या मोठ्याने सांगत सुटलेलो आहोत. वैयक्तिक नाजूक क्षणाचे आणि अनुभवांचे जाहिरीकरण करत असताना अनेकदा आपल्या हे लक्षात येत नाही की आपण आपल्या जगण्याच्या मूलभूत संवेदनाच बोथट करतो आहोत. अति झालं आणि हसू आलंफ असं म्हणतात तसंच, सातत्याने आपल्यापुरतं असलेलं जगणं जाहीर केल्याने कुठेतरी आपण जगण्यातल्या अनेक गोष्टींबद्दल असंवेदनशील होत जातो. तंत्रज्ञान मागत नाही इतकं जास्त अनेकदा आपण तंत्रज्ञानाला पुरवतो आहोत आपल्याही नकळत. आणि हे सगळं बघत आपली मुलं वाढतायेत, तरुण होतायेत हेही आपल्या लक्षात येत नाहीये. एखाद्या विषयाबद्दल जागरूकता असणं वेगळं आणि असंवेदनशील होत जाणं वेगळं. यातला फरक समजून घेणं आजच्या काळात फार गरजेचं आहे. मल्टीटास्किंग हे अत्यावश्यक कौशल्य झालं आहे, ज्याची खरंतर प्रत्येकाला गरज असतेच असं नाही. चार ऐवजी चार हजार गोष्टी एकाच वेळी करत असताना आपल्या मना- मेंदूचं जे काही होतंय त्याकडे

आहे आणि आहेही! तो जितका सच्चा आणि खरा आहे तितकाच तो खोटा आहे. आभासी जगातली माहितीच फक्त फेकफ असते असं नाहीये, माणसं ही फेक असतात, माणसांच्या प्रतिमा, त्यांचे शब्द, त्यांनी वापरलेले इमोजी या सगळ्या गोष्टी फेकफ असू शकतात. पण हे शोधण्यासाठी, समजून घेण्यासाठी आपल्याकडे वेळ आहे का?

आपल्याला आपल्याही नकळत अनेक सवयी ऑनलाईन जगात लागतात. मग स्वतःच्या भावना फेकफ करण्यापासून चुकीची माहिती शेअर करण्यापासून, एखाद्याला त्रास देण्यापर्यंत अनेक सवयी आपण स्वतःला लावून घेतो आहोत. ट्रोल करणं ही वृत्ती किंवा वैचारिक मतभेदाची गोष्ट न राहता अनेकांसाठी सवयफ झालेली सोशल मीडियावर सहज पाहायला मिळते. आपल्या डिजिटल सवयी आणि त्यामुळे बदलेलं वर्तन याकडे अजूनही आपण डोळसपणे पाहायला तयार नाही. या लेखमालेतून या सगळ्याचाच उहापोह करण्याचा प्रयत्न आहे. आपल्या जगण्याचं आपण नेमकं काय करतो आ-होत, जेन झी आणि त्यांच्या मागची पुढची पिढी त्यांच्या जगण्याकडे कसं बघते आहे, त्यातले प्रश्न काय आहेत, ताणेबाणे काय आहेत हे जरा समजून घेऊया. मुलांच्या मोबाईलचं करायचं काय हा प्रश्न स्वतःला विचारताना हातातल्या मोबाईलकडे तटस्थपणे बघण्याचीही एक संधी आपणही आपल्याला द्यायला हवी आहे. देऊया का?

# दृढ संकल्पात सर्व शक्य



आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव-जी-वनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपास-नानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत -वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि-विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम-उपनियमाने बांधिल नाही. याद्व-रे सुख व दुःख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंत:करण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत बिझते. साधना व साध्य दोन वेगवेळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान-स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे.

जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून

# एका लहानशा खोलीसाठी...

थकलेली माणसे : विजय तरवडे

तुम्ही आम्ही लहानपणी पाठ्यपुस्तकात वाचलेले असते. मॅन इज अ सोशल ॲनिमल. माणूस हा समाज करून राहणारा 'प्राणी' आहे; पण कळप करून राहणारे अनेक प्राणी एकजुटीने एकदिलाने राहतात. तसा माणूस राहू शकत नाही. माणसांचे आपसात अनेक कारणांवरून मतभेद, भांडणे-युद्धे होतात. त्यातले महत्त्वाचे कारण म्हणजे जमीन किंवा वित्त. माणसे जमिनीवर हक्क सांगतात. माणसे आपल्या श्रमांचे संपत्तीत रूपांतर करून तिचा संचय करतात. मग, जमीन आणि संचय केलेली संपत्ती यावरून माणसे आपसात भांडतात. एकमेकांच्या जिवावर उठतात. प्राण्यांपेक्षा असलेले हे वेगळेपण माणसांना वृद्धापकाळी त्रासदायक ठरते.

जमिनीच्या एका क्षुद्र तुकड्यासाठी रक्ताच्या नात्यातली तीन वृद्ध माणसे एकमेकांपासून कशी तुटली आणि वेगाने एकटी पडली ते आता सांगतो. शहराच्या मध्यवर्ती भागात एक अगदीच लहानसा एकमजली वाडा होता. इनमिन चार खोल्या, पुढे अंगण, मागे परस. कोणे एके काळी तिथे नवरा बायको, मुलगा, मुलगी असे चौरस कुटुंब नांदले होते. कुटुंबप्रमुख असलेल्या नवर्याने कर्ज वगैरे काढून हा चिमुकला वाडा बांधला. यथावकाश दोन्ही अपत्यांची लग्ने लावून दिली. मुलगा आणि सून यांनी त्याला



दोन नाती दिल्या. मुलगी मात्र दुर्दैवी निघाली. नवर्याशी पटले नाही. गर्भवती असतानाच ती माहेरी आली. ती कायमसाठी. तो जुना काळ होता. तिचा पुनर्विवाह होऊ शकला नाही; पण तिला नोकरी लागली.

बापाने मरणाआधी मृत्युपत्र केले. त्यात मुलगा आणि सुनेला तीन खोल्या दिल्या. मुलगी आणि नातीला एक खोली दिली. आता निवेदनाच्या सोयीसाठी आपण मुलगा आणि सुनेला दादा आणि वहिनी म्हणू. मुलीला अक्का म्हणू.दादाच्या मुली लग्नानंतर काही वर्षे विदेशात गेल्या आणि भरपूर कमावल्यानंतर जावयांसह घरी परतल्या. अक्काची मुलगी गावातच राहून शिकली आणि लग्न करून सासरी गेली.

वाड्यात फक्त दादा, वहिनी आणि अक्का उरले. तिघांची वये ऐंशीच्या पुढे गेलेली होती. दादाच्या मुलींनी आता अक्काकडे हट्ट धरायला सुरुवात केली की, तू तुझ्या मुलीकडे राहायला जा. ही खोली आम्हाला दे. आम्ही वाड्याचा पुनर्विकास करू. अक्काला जावयाकडे जाणे मान्य नव्हते. तिने नकार दिला. मग, तिचा छळ सुरू झाला. तरी तिने दाद दिली नाही. खोली सोडणार नाही म्हणून टिच्चून तिथेच थांबली.

वय कोणासाठी थांबत नाही. अक्का आजारी पडली. काही दिवस रुग्णालयात दाखल झाली. घरी आल्यावर अंथरुणाला खिळली. विदेशा-तून मुलीने तिच्यासाठी महागड्या केअरटेकरची व्यवस्था केली. केअरटेकर चोवीस तास तिला सोबत करू लागली. अक्काचे डायपर्स पाहून दादा-वहिनी नाक मुरडू लागले. टोमणे मारू लागले. वाड्यातल्या चार खोल्यांपैकी एकाच खोलीत स्वयंपाकघर होते. त्यांनी अक्काला स्वयंपाकघरात बंदी केली. अक्काच्याच खोलीच्या कोपर्यात केअर टेकर स्वयंपाक करायची. अक्काला चांगल्या वृद्धाश्रमात जाणे अवघड नव्हते; पण मुलीने निरोप दिला की, खोली सोडायची नाही. एकदा ताबा गेला की गेला.

एका पहाटे केअरटेकरने अक्काच्या मुलीला फोन केला. अक्का गेली होती. जावयासह मुलगी आली. नातलग जमले, औपचारिक रडले, दादा-वहिनी नाटकी रडले. अक्काचे अंत्यसंस्कार पार पडले. अक्काच्या खोलीला भक्कम कुलूप लावून मुलगी परत गेली. गोष्ट इथे संपली नाही. परसाकडे जाण-ारा रस्ता अक्काच्या खोलीसमोरून जात होता. रात्री बेरात्री वहिनीला भास होऊ लागले नणंदेच्या हाका येऊ लागल्या. तिने सगळीकडे मोठे दिवे लावले. रात्रभर दिवे चालू ठेवू लागली. तरी भीती जाईना. ती झोपेत बडबड करू लागली. रात्री झोपेतून उठून नवर्याला विचारू लागली की अहो, तुम्हाला वन्संची हाक ऐकू आली का? कुलूपबंद दारातून अक्का आरपार येते आणि तिच्याकडे बघून हसते, कधी-कधी रडते. वहिनीचे वेड हाताबाहेर गेले आहे; पण तिला रुग्णालयात नेले तर दादा एकटा पडेल. त्याला कोणी सांभाळायचे. म्हणून, मुली त्यांना इथेच राहण्याचा आग्रह करतात. वाड्यात सगळीकडे देवांचे फोटो लागले आहेत. दिवे रात्रभर चालू राहतात. रात्री चालणार्या वहिनीच्या बडबडीचा-रडण्याचा त्रास होतो म्हणून शेजारच्या घरातली माणसे करवादतात. ही हकीकत दोन वर्षांपूर्वीची- शेवट फार वाईट झाला, तो सांगत नाही; पण लोभापायी येणारे असे वृद्धत्व आपण शक्यतो टाळायला हवे. इतकंच कळकळीचे सांगणे आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

### जांभळाचे सरबत



साहित्य – पाव किलो जांभळे, एक ग्लास साखर.
कृती – जांभळे बुडतील इतक्या पाण्यात कुकरमध्ये उकडून घ्या . पाण्यासह जांभळे कुस्करून बिया काढा. मिक्सर मध्ये फिरवून (हवे असल्यास गाळून ) घ्या. एक ग्लास साखरेचा दोन तरी पाक करून घ्या. थंड झाल्यावर पाक आणि जांभूळ गर मिसळा. एक ग्लास सरबत बनवताना पाऊण ग्लास मिश्रण आणि पाव ग्लास पाणी घाला. **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

## २ Joke विनोद




मुन्ना : तुला जप-ानी बोलता येते?
पप्पू : हो.
मुन्ना : बोल बरं.
पप्पू : जपानी.

## ३ Message संदेश




Santa Banta Hindi Jokes
Banta: Santa, itna udhaas kyu baita hai?
Santa: yaar betting mein maine 2000 gavaa diyaa :-(
Banta: kaise?
Santa: India pe 1000 rupaiye ka bet lagaaya tha aur India ne match haar gaya
Banta: lekin 2000 kaise?
Santa: aaj us match ka highlights daale. India pe ummeed rakh ke phir 1000 dala tha.

## ४ Thought सुविचार



जर विज्ञानावर शहाणपणाचे नियंत्रण नसेल तर ते भ्रमिष्टपणाने वागेल. – स्पॅनिश म्हण


**संस्कृत सुभाषित**

**अमित्रमुपसेवेत विश्वस्तवदविश्वसन्**
**प्रियमेव वदेन्नित्यं नाप्रियंकिंचिदाचरेत्।।**

(शांतीपर्व, अध्याय १०३, ेक ९, महाभारत)

अर्थ –शत्रूवर विश्वास न ठेवता विश्वास ठेवल्याचा बहाणा करून त्याच्या कलाने वागावे. त्याच्याशी नेहमी गोड बोलावे. त्याला न रुचणारी गोष्ट करू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. जमिनीवरचे प्राणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
१०. प्रचंड, तीव्र
११. नजरेचा तीर
१६. गालबोट
१७. उडाणटप्पूंची चैन
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृतिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी, सर्वत्र
३८. वंचित
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाशी गुणोत्तर
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. लेंगा
५७. परिस्थिती
५८. अंगठी घालण्याचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. शत्रूला गाठण्याची चिंचोळी जागा
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. बघू नये अशी स्वयंपाकाची जागा!
७९. जयाचा नामघोष

**उभे शब्द**

१. 'सिने में ---, आंखो ने तुफान सा क्यों है, इस शहर में हर शख्स परेशानसा क्यों है'
२. पक्के वचन
३. सभ्य माणसांचे 'व्यसन'!
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. आमंत्रक, कुटुंबोप्रमुख
७. संकटातून निभावणे
८. जवळचा घरातील शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. बारीक वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कण्यातील हाड
१९. पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट, खल
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. मौल्यवान खडा (हिंदी)
३१. मालवणी गोडी शेव
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. शाहरुखचे फिल्मी नाव
४०. रम्य, मनोहर
४१. तेंडुलकरांचे वादग्रस्त नाटक 'घाशीराम ----'
४२. पैजेत पीळ देण्याची-उतरवण्याची
४४. जननी
४५. शाळकरी मुलांना, नोकरदारांना हवा-हवासा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. गायींचे पिल्लू
५३. लक्ष्मीवल्लभ
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. इंग्रेजी वर्णमालेतील शेवटून दुसरे अक्षर

**आडवे उत्तर**

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहीतगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजमा ५७.हालह-लाव ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.भटारखाना ७९.जयजयकार

**उभे उत्तर**

१.जलन २.वचन ३.चहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तन-ीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यर्थाथ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसान-घात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.खाजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.श्रीनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पार ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय




# इच्छाधारी नागाच्या भूमिकेत दिसणार हा प्रसिद्ध अभिनेता



कार्तिकच्या आगामी 'नागझिला: नाग लोक का पहला कांड' या चित्रपटाची पहिली झलकही समोर आली आहे. या चित्रपटात कार्तिक एका इच्छा पूर्ण करणाऱ्या सापाची भूमिका साकारताना दिसणार आहे.
बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन शेवटचा गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटात दिसला होता. या चित्रपटात अनन्या पांडेने कार्तिकच्या विरुद्ध मुख्य भूमिका साकारली होती. मात्र, कमाईच्या बाबतीत हा चित्रपट फारसा यशस्वी ठरला नाही. आता कार्तिक लवकरच एका इच्छा पूर्ण करणाऱ्या सापाच्या रूपात पडद्यावर आपली जादू दाखवताना दिसणार आहे. कार्तिकच्या आगामी 'नागझिला: नाग लोक का पहला कांड' या चित्रपटाची पहिली झलकही समोर आली आहे. या चित्रपटात कार्तिक एका इच्छा पूर्ण करणाऱ्या सापाची भूमिका साकारताना दिसणार आहे. अमेझॉन प्राइम व्हिडिओने १९ मार्च रोजी मुंबईत आयोजित 'इट स्टार्ट्स हिअर' कार्यक्रमात, कार्तिक आर्यन-अभिनीत 'नागझिला: नाग लोक का पहला कांड' हा चित्रपट २०२६ च्या कंटेंट स्लेटचा भाग म्हणून अधिकृतपणे लॉन्च केला. या घोषणेमुळे हा फँटसी क्रिएचर-कॉमेडी चित्रपट स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मच्या प्रमुख आगामी थिएटर-बॅक्ड प्रोजेक्ट्सपैकी एक म्हणून स्थापित झाला आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरने चित्रपटाच्या वातावरणाची आणि भव्यतेची पहिली झलक दिली. यामध्ये कार्तिक आर्यन एका महाकाय सर्पासमोर उभा असल्याचे दिसते. 'फुक्रे' फ्रँचायझीसाठी ओळखले जाणारे मृगदीप सिंग लांबा यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट, मृगदीप सिंग लांबा यांनी साकारलेल्या इच्छा पूर्ण करणाऱ्या एका सर्पाभोवती फिरतो. मृगदीप सिंग लांबा यांच्या पूर्वीच्या पोस्टनुसार, ते प्रेमवदेश्वर प्यारे चंद यांची भूमिका साकारत आहेत.
जाहिरात
या चित्रपटाची निर्मिती धर्मा प्रॉडक्शन्स आणि महावीर जैन फिल्म्स यांनी केली आहे. १४ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणारा हा चित्रपट, स्वातंत्र्यदिनाच्या वीकेंडला बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे, त्यानंतर मेझॉन प्राइम व्हिडिओवर त्याचा विशेष डिजिटल प्रीमियर होईल. इतर प्रमुख आकर्षणांमध्ये, या स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मने सिद्धार्थ मल्होत्रा-अभिनीत 'वन: फोर्स ऑफ द फॉरेस्ट' या चित्रपटाचे चित्रपटगृहांनंतरचे स्ट्रीमिंग हक्क निश्चित केले. याव्यतिरिक्त, आलिया भट्ट-निर्मित 'डोन्ट बी शाय' आणि हृतिक रोशनच्या एचआरएक्स फिल्म्सचा नवीन उपक्रम 'मेस' यांसारखे चित्रपटही प्रदर्शनाच्या मार्गावर आहेत. चाहत्यांच्या आवडत्या मालिकांच्या पुनरागमनाची घोषणाही करण्यात आली, ज्यात 'पंचायत' आणि 'कॉल मी बे' या मालिकांच्या नवीन सीझन्सचा समावेश आहे. याशिवाय, या कार्यक्रमात 'मिर्झापूर द मूव्ही' द्वारे फ्रँचायझीच्या विस्ताराावर प्रकाश टाकण्यात आला, ज्यात या हिट मालिकेतील मूळ कलाकार आहेत.

# 'धुरंधर द रिव्हेंज'च्या प्रदर्शनासोबत 'राजा शिवाजी' चित्रपटाचा टीझर

मुंबई : जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी प्रस्तुत बहुप्रतीक्षित चित्रपट 'राजा शिवाजी' चा फर्स्ट लूक टीझर आता प्रेक्षकांसमोर येणार असून, हा खास अनुभव केवळ चित्रपटगृहांमध्येच पाहायला मिळणार आहे. विशेष म्हणजे हा फर्स्ट लूक टीझर 'धुरंधर-द रिव्हेंज' या चित्रपटाच्या प्रदर्शनासोबत दाखवण्यात येणार आहे. त्यामुळे १८ मार्चपासून सुरू होणार्या सशुल्क प्रिव्ह्यूद्वारेही प्रेक्षकांना या भव्य ऐतिहासिक चित्रपटाची पहिली झलक पाहण्याची संधी मिळणार आहे.
छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, स्वाभिमानाची आणि स्वराज्य स्थापनेच्या प्रवासाची सिनेमॅटिक झलक मोठ्या पडद्यावर नक्की बघा. रितेश विलासराव देशमुख यांची प्रमुख भूमिका असलेल्या आणि दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात भारतातील एका महान योद्धाची गाथा , त्याचा स्वराज्य स्थापनेचा संघर्ष या फर्स्ट लूक टीझर मधून दिसेल.



या भव्य ऐतिहासिक कलाकृतीला संगीत अजय-अतुल यांनी दिले आहे.
जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनीच्या बॅनरखाली ज्योती देशपांडे आणि जेनेलिया देशमुख निर्मित 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असून शौर्य, सन्मान आणि स्वराज्याच्या जन्मास भव्य आदरांजली अर्पण करणारी ही ऐतिहासिक गाथा आहे.




# अखेर प्रतीक्षा संपली, मिर्जापुर सीरीजच्या प्राइम वीडियोने जाहीर

मिर्झापूरचे जग सिरीजच्या पलीकडे जाऊन एका चित्रपटाच्या रूपात विस्तारणार आहे. प्राइम व्हिडिओवर मिर्झापूरच्या कथेवर आधारित एक चित्रपट तयार होत असून, त्याच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच जाहीर झाली आहे.
प्राइम व्हिडिओची 'मिर्झापूर' ही सिरीज प्रचंड गाजली होती आणि आजही लोक त्यातील पात्रांना विसरलेले नाहीत. आता, मिर्झापूरचे जग सिरीजच्या पलीकडे जाऊन एका चित्रपटाच्या रूपात विस्तारणार आहे. प्राइम व्हिडिओवर मिर्झापूरच्या कथेवर आधारित एक चित्रपट तयार होत असून, त्याच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच जाहीर झाली आहे. हा चित्रपट आता ४ सप्टेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. प्राइम व्हिडिओ इंडियाने एक नवीन पोस्टर प्रदर्शित करून या चर्चेला आणखी हवा दिली आहे, जे या अंडरवर्ल्ड कथेतील एका अधिक विस्तृत आणि दृश्यात्मक दृष्ट्या आकर्षक अध्यायाचे संकेत देत आहे.

नव्याने प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये, मिर्झापूरमधील परिचित गोंधळ एका रखरखीत वाळवंटी प्रदेशात पुन्हा साकारण्यात आला आहे. जीपचा ताफा वाळूच्या ढिगाऱ्यांवरून वेगाने जात आहे आणि त्या ओसाड प्रदेशातून प्रवास करताना धुळीचे लोट उडवत आहे. सर्वात धक्कादायक दृश्यांपैकी एकामध्ये, एका मृतदेहाला गाडीच्या मागे फरफटत नेले जात असल्याचे दाखवले आहे, ज्यामुळे वाळूवर रक्ताचा ठसा उमटत आहे आणि या फ्रँचायझीचे वैशिष्ट्य बनलेल्या क्रूरतेला त्वरित बळकटी मिळत आहे. प्रखर आकाश, वाळवंटातील एकांत आणि हिंसक दृश्ये हे सूचित करतात की, या मालिकेला एक अभूतपूर्व यश मिळवून देणारा क्रूरपणा कायम ठेवत, चित्रपट अधिक भव्य आणि सिनेमॅटिक स्तरावर पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. मुख्य कलाकार श्वेता त्रिपाठी आणि अली फजल यांनी यापूर्वीच पुष्टी केल्यानुसार, चित्रपटाचे मुख्य चित्रीकरण फेब्रुवारी २०२६ मध्ये पूर्ण झाले आहे.
या चित्रपटाचे सर्वात चर्चेत असलेले वैशिष्ट्य म्हणजे, मालिकेच्या दुसऱ्या सीझनमध्ये मरण पावलेले पात्र, मुन्ना भैय्याच्या भूमिकेत दिव्येंदू परत येत आहे. फ्रँचायझीमधील मुख्य कलाकार कायम आहेत, ज्यात पंकज त्रिपाठी अखंडानंद कालीन त्रिपाठी, अली फजल गुड्डू पंडित, श्वेता त्रिपाठी गोलू गुप्ता आणि अभिषेक बॅनर्जी सुबोध (जो कंपाउंडर म्हणून प्रसिद्ध आहे) यांच्या भूमिकेत परत येत आहेत. या चित्रपटाद्वारे जितेंद्र कुमार आणि सोनल चौहान हे मिर्झापूरच्या दुनियेत पदार्पण करणार आहेत. या प्रोजेक्टचे दिग्दर्शन गुरमीत सिंग यांनी केले आहे, ज्यांनी मूळ मालिकेच्या अनेक भागांचे दिग्दर्शनही केले होते. याची निर्मिती फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी एक्सेल एंटरटेनमेंट बॅनरखाली केली आहे.



# सई मांजरेकरची द इंडिया हाऊसमध्ये एन्ट्री, राम चरणबद्दलही व्यक्त केल्या भावना, म्हणाली

अभिनेत्री सई मांजरेकरची मद इंडिया हाऊस एन्ट्री झाली असून तिने तिचा आनंद व्यक्त केला आहे, ती म्हणाली, मफऐतिहासिक चित्रपटात काम करण्याचे तिचे स्वप्न होते...अभिनेत्री सई मांजरेकर तिच्या ङ्गद इंडिया हाऊसफ या पॅन-इंडिया चित्रपटाबद्दल खूप उत्साहित आहे. १९०५ सालच्या प्रेम आणि क्रांतीच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेल्या या चित्रपटात सई सतीची भूमिका साकारणार आहे. चित्रपटाबद्दल बोलताना सई म्हणते की, ऐतिहासिक चित्रपटात काम करण्याचे तिचे स्वप्न होते, जे या चित्रपटाद्वारे पूर्ण होत आहे.
चित्रपटाबद्दल ङ्गद टाइम्स ऑफ इंडियाफशी बोलताना अभिनेत्री म्हणाली, ऐतिहासिक चित्रपटात काम करणे हे माझे नेहमीच स्वप्न होते. मला अभिनेत्री व्हायचे आहे हे कळल्यापासून, मला ऐतिहासिक चित्रपटात काम करण्याची इच्छा होती. त्यामुळे, हे माझ्यासाठी स्वप्नपूर्तीसारखे आहे. ङ्गद इंडिया हाऊसफचा भाग असणे हा एक खूप खास आणि अद्भुत अनुभव आहे. जेव्हा मी पहिल्यांदा कथा ऐकली, तेव्हाच मला कळले की हा केवळ एक चित्रपट नाही, तर भावना, इतिहास आणि उद्देश यांना सामावून घेणारी एक कथा आहे.
आपल्या भूमिकेबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली, माझं पात्र सती आहे आणि ही एक सुंदर भूमिका आहे. ती दृढनिश्चयी असूनही प्रेमळ आणि दयाळू आहे. स्वतःमध्ये हा समतोल साधणे हा एक खरोखरच अविस्मरणीय अनुभव होता.मला आठवतंय, मी अनेकदा सीनच्या मध्येच ङ्गकृपयाफ किंवा ङ्गधन्यवादफ असे शब्द उच्चारायचे, जे आपण इतर प्रकारच्या चित्रपटांमध्ये सहज वापरतो. मग मी माफी मागून तो सीन पुन्हा शूट करायचे. त्या काळाबद्दल जाणून घेणे आणि लोकांची जीवनशैली, पोशाख आणि बोलण्याच्या पद्धती समजून घेणे हा एक रंजक अनुभव होता. इतका समृद्ध इतिहास असलेल्या हंपीसारख्या ठिकाणी शूटिंग केल्याने मला खूप काही शिकायला मिळालं.
चित्रपटाच्या टीमसोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल बोलताना साई म्हणाली, राम चरणच्या पहिल्या निर्मितीमध्ये काम करणे खरोखरच अनमोल आहे. तो दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठ्या स्टार्सपैकी एक आहे. सिनेमा आणि त्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाप्रती असलेला त्याचा आदर या चित्रपटाच्या प्रत्येक पैलूमध्ये दिसून येतो.
ङ्गमाझ्या लग्नात मला बोलावलंच नाहीफ, भाऊ कदमच्या व्हायरल पोस्टवर लेकीची प्रतिक्रिया; मीडियावर साधला निशाणा

निखिल सिद्धार्थ आणि अनुपम खेर यांच्यासोबत स्क्रीन शेअर करणे हा एक मोठा शिकण्याचा अनुभव होता. अशा प्रतिभावान कलाकारांसोबत सेटवर असणे तुम्हाला दररोज सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी प्रेरणा देते. प्रेम, क्रांती आणि भारताच्या आत्म्याचा उत्सव साजरा करणाऱ्या चित्रपटाचा भाग होण्याची संधी मिळाल्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते.

# दिवंगत विक्रम गोखलेयांचा अखेरचा चित्रपट बेवारस लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस!


अभिनेते विक्रम गोखले यांचा अखेरचा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अत्यंत हृदयस्पर्शी आणि सामाजिक आशय असलेला 'बेवारस' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून, गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर या चित्रपटाचे पोस्टर लाँच करण्यात आले आहे. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित आणि शिव आर्यन फिल्म्स प्रस्तुत 'बेवारस' या चित्रपटाची निर्मिती रिया कुमार आणि नितीन विचारे यांनी केली आहे. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन विजय राणे यांनी सांभाळले असून, पटकथा आणि संवाद लेखन शिरीष लाटकर यांचे आहे. गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन विवेक आपटे, यूजीन डिसोझा आणि महेश कोळी यांनी केले आहे. छायांकन अमीर हडकर, पार्श्वसंगीत आणि संकलनाची जबाबदारी अनुक्रमे संबंधित तंत्रज्ञांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे. या चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गिते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, विद्याधर जोशी, श्रीजित मराठे आणि आदित्य देशमुख यांसारख्या दिग्गज कलाकारांची भक्कम फळी पाहायला मिळणार आहे.
चित्रपटाच्या पोस्टरमध्ये विक्रम गोखले एका लहान मुलाला मिठी मारताना दिसतात, आणि त्यांच्या डोळ्यातील भाव प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे आहेत. पोस्टरप्रमाणेच चित्रपटाची कथा देखील तितकीच हृदयस्पर्शी आहे. अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ 'आबाजी'ची भूमिका विक्रम गोखले यांनी साकारली आहे. एका लहान अनाथ मुलाच्या हक्कांसाठी चाललेला संघर्ष, आणि तो आपल्या आई-वडिलांविरोधात कोर्टात का उभा राहतो, या अनोख्या कथानकातून चित्रपट सामाजिक वास्तवावर भाष्य करतो.
चरारलहूर त्रेंूरश्र गर्रीूः विजू माने घेऊन येतायत मैत्री-मस्तीची धमाल गोवा ट्रिप; 'मामाच्या गोव्याला जाऊया'चा मुहूर्त संपन्न




विक्रम गोखले यांची अखेरची कलाकृती बेवारस लवकरच मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी चाहते खूप उत्सुक आहेत. गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 'बेवारस' चित्रपटाचं नवं पोस्टर समोर आले आहे.
दिवंगत विक्रम गोखलेयांचा अखेरचा चित्रपट
'बेवारस' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस
'बेवारस' चित्रपटाची काय आहे कथा?
मराठी रंगभूमी तसेच मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि मान्यवर भावनिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांचा वेध घेणारा हा चित्रपट प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा ठरणार आहे. विशेष म्हणजे विक्रम गोखले यांची ही अखेरची कलाकृती असल्याने या चित्रपटाला एक वेगळीच भावनिक जोड मिळाली आहे. बेवारस हा चित्रपट प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच देणार नाही, तर एक संवेदनशील सामाजिक संदेशही देणार आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार असून, या भावनिक प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

# नुरा फतेही च्या सरके चुनर गाण्याची गायिका कोण?

९ वर्षांत ८० हून अधिक गाणी, आता करतेय ट्रोलिंगचा सामना
हे प्रकरण संसदेपर्यंत पोहोचले असून, अनेक प्रमुख व्यक्तींना नोटीस बजावण्यात आली आहे. या गदारोळानंतर, गायिकेला आपली चूक लक्षात आली आणि तिने माफी मागितली. नोरा फतेहीच्या 'सरके चुनार' या गाण्यावरून सुरू असलेला वाद वाढतच चालला आहे. गाण्यातील कथित अश्लील लिरिक्सवरून लोक सोशल मीडियावर आपली नाराजी व्यक्त करत आहेत. हे प्रकरण संसदेपर्यंत पोहोचले असून, अनेक प्रमुख व्यक्तींना नोटीस बजावण्यात आली आहे. या गदारोळानंतर, गायिकेला आपली चूक लक्षात आली आणि तिने माफी मागितली. कोणाच्याही भावना दुखावण्याचा आपला हेतू नव्हता, असे तिने स्पष्टपणे सांगितले.
सोशल मीडियावर वाढत्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर, तिने चाहत्यांना आणि सर्वसामान्य जनतेला समजून घेण्याचे आवाहन केले आहे. या संपूर्ण घटनेमुळे गाण्याबद्दल मोठी चर्चा सुरू झाली आहे. इन्स्टाग्रामवरील एका पोस्टमध्ये गायिकेने लिहिले आहे की, गाण्याचे बोल बदलले जातील. तिने सांगितले की, आक्षेपार्ह शब्द काढून टाकून लवकरच एक नवीन आवृत्ती प्रसिद्ध केली जाईल. तिने असेही सांगितले की, जनभावनेचा आदर म्हणून हे गाणे सर्व प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्यात आले आहे.
अनेकांनी गाण्याचे बोल अश्लील आणि आक्षेपार्ह असल्याचे म्हटले. हे प्रकरण संसदेपर्यंत पोहोचले. सरकारने हे गाणे आधीच प्रतिबंधित करण्यात आल्याची घोषणा केली, ज्यामुळे या वादाला आणखी खतपाणी मिळाले.
गाण्यात दिसणारे नोरा फतेही आणि संजय दत्त हेदेखील या वादात अडकले. मात्र, दोघांनीही या संपूर्ण प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवले आहे. नोरा फतेहीने सांगितले की, तिने या गाण्याची कन्नड आवृत्ती सुमारे तीन वर्षांपूर्वी रेकॉर्ड केली होती. तिने असेही सांगितले की, जेव्हा तिने हिंदी आवृत्ती ऐकली, तेव्हा तिने तात्काळ निर्मात्यांना त्याबद्दल कळवले. गाण्याचे बोल लिहिणारे गीतकार रकीब आलम यांनीही या वादावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, त्यांना कन्नड गाण्याचे थेट भाषांतर करण्यास सांगितले होते आणि त्यांनी तेच केले.
तिच्या म्हणण्यानुसार, हिंदी गाण्याचे बोल आक्षेपार्ह असू शकतात, असा इशारा तिने निर्मात्यांना आधीच दिला होता. तिने हेही उघड केले की, मूळ कन्नड गाणे चित्रपटाचे दिग्दर्शक प्रेम यांनी लिहिले होते.



# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूरमध्ये स्वच्छता व आरोग्याचा जागर

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा लातूर शहराचे लोकप्रिय आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर शहरात स्वच्छता आणि आरोग्य यांचा जागर करण्यात आला. विलासराव देशमुख फाउंडेशन आणि लातूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग क्रमांक १२ मध्ये माझा प्रभाग, स्वच्छ प्रभाग या अभिनव संकल्पनेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.



याप्रसंगी शहराला स्वच्छ ठेवणाऱ्या महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचारी व महिला कामगारांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने या स्वच्छता दूतांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. टवेन्टिवन अ‍ॅग्रीच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संविधान चौक ते दत्त मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता, प्रत्यक्ष प्रभागात काम करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत संविधान चौक ते दत्त मंदिर या दरम्यान स्वच्छता करण्यात आली. साचलेला कचरा आणि सांडपाणी हटवून डेंग्यू, मलेरिया व चिकनगुनियासारख्या आजारांचे निर्मूलन करणे, कचरा वर्गीकरण करणे आणि विशेषतः लहान मुले व ज्येष्ठांच्या आरोग्यासाठी ''कचरामुक्त परिसर'' ही संकल्पना यावेळी राबवण्यात आली.

लोकसहभागातून शहर सुंदर बनवण्याचा संकल्प कार्यक्रमाचा शुभारंभ करताना महापौर जयश्री सोनकांबळे म्हणाल्या की, शहराला सुंदर आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू झालेला हा उपक्रम शहरासाठी आदर्श ठरेल.

यावेळी उपमहापौर अ‍ॅड. स्नेहल उटगे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किरण जाधव, फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, गटनेते विजयकुमार साबदे यांनीही समयोचित मार्गदर्शन केले.

मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्याला विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक सूर्यकांत कातळे, नगरसेवक धोंडीराम यादव, सतीश साळुंके, फिरदोस आरिफ शेख, बाळासाहेब (पप्पू) देशमुख, दत्ता सोमवंशी, आयुब मणियार, भालचंद्र सोनकांबळे, प्रविण सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. बी.एस. वाकुरे, प्राचार्य शिंदे, प्राचार्य साखरे, अविनाश देशमुख, डॉ. शिवाजीराव जवळगेकर, नारायण कांबळे, गिरीश दिवेकर, नरसिंग घोडके, राजकुमार नामवाड, नागनाथ लोंढे, नागनाथ डोंगरे, पांडुरंग सावंत, आर.एन.कसबे, डी.एम.जगताप, संदीपान सूर्यवंशी, तुकाराम केदासे, प्रल्हाद साळुंखे, रवी कसबे, एल. आर. कांबळे, उर्मिला मुगळे, शुभांगी राऊत, रेखा शिखरे, मीना टेंकाळे, शोभा ओव्हळ, संजय ओव्हळ, चंद्रमुनी कांबळे, संतोष नाईकवाडे, धर्मेंद्र मुन्ना शिंदे, अभंग चव्हाण, गोरख माळी, गजानन साळुंके, धनंजय शिंदे, अतुल माने, श्रीकांत कातळे, सुधीर जाधव, कुणाल कदम आणि जालिंदर बर्डे यांची उपस्थिती होती.

या मोहिमेत विलासराव देशमुख फाउंडेशनच्या फार्मसी, इंजिनिअरिंग आणि पॉलिटेक्निक कॉलेजमधील विद्यार्थी, शिक्षक वृंद तसेच परिसरातील नागरिक आणि महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## भादा-औसा परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद नाही

**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक २०.०३.२०२६ रोजी भादा व औसा परिसरात भूगर्भातून आवाज आल्याची माहिती स्थानिक प्रशासनास प्राप्त झाली होती. सदर घटनेची माहिती जिल्हा प्रशासनामार्फत तात्काळ , नवी दिल्ली यांच्याकडे पडताळणीसाठी पाठविण्यात आली. त्यांच्या तपासणीनुसार भादा-औसा परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नसल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामुळे सदरील घटना भूगर्भातील नैसर्गिक हालचालींमुळे निर्माण होणाऱ्या आवाजाचा प्रकार असण्याची शक्यता आहे.

जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये व प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

– – जिल्हा प्रशासन लातूर

## लातुरात डॉ. भूषण शुक्ल यांच्या उपस्थितीत पालकशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

**लातूर/प्रतिनिधी :** पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी लातुरात तंत्रज्ञान युगातील पालकत्व – कानगोष्टी पालकत्वाच्या या विषयावरील पालकशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस लातूर शहर व परिसरातील पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरचे संचालक डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी केले आहे.

सद्यस्थितीत समाजात अनेक पातळीवर बदल होत असलेले पाहावयास मिळतात. प्रत्येक पालक आपआपल्या परीने पाल्यांना सर्व काही उत्कृष्ट दर्जाचे देण्याचा प्रयत्न करत असतात. आपल्या पाल्याचे भवितव्य उज्वल घडावे, तो समाजात एक आदर्श नागरिक म्हणून घडावा यासाठी पालक जीवाचे रान करताना दिसतात. तरीही मुलांना घडविताना , वाढविताना पालकांनाही अनेक प्रश्नांचा सामना करावा लागतो. त्यांनाही अनेक प्रश्न पडतात. पालकांना येणाऱ्या अडचणीवर मात करण्याचे कानमंत्र या आगळ्यावेगळ्या पालकशाळेच्या माध्यमातून डॉ. भूषण शुक्ल देणार आहेत. मुलांना वाढविताना जाणते – अजाणतेपणे पालकांकडून होणाऱ्या चुकांबद्दल ते यावेळी कानउघाडणीही करणार आहेत. रविवारी सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात डॉ. भूषण शुक्ल यांच्यासोबत पालकांनाही संवादही साधता येणार आहे. हा कार्यक्रम स्वर, लातूर, अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरच्या संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. या पालकशाळेस जास्तीत जास्त पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम लवकरच सुरु होणार; मतदारांनी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यात मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम लवकरच सुरू होत आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी मतदार यादी अद्ययावत करण्याचे महत्त्वाचे कामे सुरू झाली असून, मतदारांना सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे. या अनुषंगाने १) Blurr Photo (धूसर किंवा अस्पष्ट छायाचित्र दुरुस्त करणे), २) DSE (Demographically Similar Entries – समान लोकसंख्याशास्त्रीय नोंदी तपासणी व दुरुस्ती), ३) SIR Mapping (मतदारांचे २००२ च्या मतदार यादीशी नकाशा संलग्नीकरण/मॅपिंग) आणि Book a Call (BLO सोबत कॉल बुकिंग) इत्यादी कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. हे कामे प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Booth Level Officer - BLO) यांनी आपल्या नेमणुकीच्या क्षेत्रातील मतदारांना समक्ष भेटून लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

२३५ लातूर शहर विधानसभा मतदार संघ आणि २३४ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी आपल्या रहिवासी मतदान केंद्रातील बीएलओ यांच्याशी समक्ष भेट घेऊन वरील कामे पूर्ण करून घ्यावीत. याशिवाय मतदार नावातील दुरुस्ती, वगळणी (Deletion) किंवा इतर आवश्यक बदलांसाठीही बीएलओ यांच्याकडे संपर्क साधावा. SIR Mapping चे काम २१ मार्च २०२६ नंतरही सुरू राहणार आहे. २००२ च्या मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://voters.eci.gov.in/searchInSIR/S2U-4DPDF-JK4QWODSE या अधिकृत लिंकचा वापर करावा. मतदारांनी मतदार यादीच्या या सखोल पुनरिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक राहण्यास मदत करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## जिल्ह्यात रमजान ईदनिमित्त मद्यविक्री बंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २१ मार्च, २०२६ रोजी एक दिवस पुढे मागे चंद्र दर्शनानुसार मुस्लिम बांधवातर्फे रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिले आहेत. मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ नुसार तसेच नमुद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.या आदेशाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

## कॉर्पोरेटमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातर्फे बीएसडब्ल्यू तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कनेक्ट फॉर (रोझी ब्ल्यु फाऊंडेशन), मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते गणेश चव्हाण उपस्थित होते.

यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, १९६० मध्ये टाटा समाज विज्ञान संस्थेद्वारे भारतात व्यावसायिक समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज कॉर्पोरेट सेक्टरमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. त्यांनी विद्यार्थ्यांना एमएसडब्ल्यू प्रवेश प्रक्रिया, गट चर्चा, फील्ड वर्क आणि प्रभावी सादरीकरण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच इंग्रजी संभाषणाची भीती न बाळगता कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. आनंद शेवाळे यांनी भूषवले. यावेळी अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगलोर येथे निवड झाल्याबद्दल अजय राऊत व गौरी रसाळ या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विभागप्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, प्रा.काशिनाथ पवार व प्रा.आशिष स्वामी उपस्थित होते.कौशल्य विकासावर स्पर्धात्मक युगात भर द्या केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकास आणि सादरीकरण शैलीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. गणेश चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात मुलाखत तंत्र, अहवाल लेखन आणि फील्ड वर्कचे महत्त्व अधोरेखित केले.

## लातूर येथे २५ मार्च रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी. आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात पुणे येथील स्वेस कॉर्प लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथील पिप्री इंजिनिअरींग प्रा. लि., पुणे येथील प्रॉम्प्ट इंडस्ट्रिअल सर्व्हिसेस प्रा.लि., सोलापूर येथील कोलब्रो ग्रुप प्रा. लि., लातूर येथील सनरिच क्का , चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रा. लि., श्रीराम फायनान्स लिमिटेड, माहिष्मती सेक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि., क्रेडीट क्सेस ग्रामीण लि., फ्यिुजन फायनान्स लिमिटेड या आस्थापना सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय. सर्व ट्रेड, डिप्लोमा सर्व ट्रेड तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होणार आहेत.

इच्छुक उमेदवारांनी बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी.आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## देवणी येथे २ एप्रिल रोजी महादेव यात्रेनिमित्त पशु व पक्षी प्रदर्शनाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत देवणी येथे गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी पशुधन व कुक्कुट गटांची नोंदणी २ एप्रिल रोजी प्रदर्शनस्थळी सकाळी ८.३० वाजता सुरु होईल व उद्घाटन ठिक ११ वाजता करण्यात येणार आहे. या पशु प्रदर्शनात देशी गोंवश (देवणी व लालकंधारी), संकरीत गोवंश, उस्मानाबादी शेळी, अश्व व कुकुट पक्षी मोठ्या संख्येने सहभागी होतात.

सर्व पशुपालकांनी आपल्या जातीवंत पशुधनासह या भव्य पशु व पक्षी प्रदर्शनात सहभागी होवून यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवणी पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी यांनी केले आहे.

असे राहतील पशुधनाचे गट

**देवणी नर गट –**

१) देवणी नर १ वर्षाखालील वासरे गट
२) देवणी नर १ वर्षावरील वासरे अदात गट
३) देवणी नर २ दात वळू गट
४) देवणी नर ४ दात वळू गट

**देवणी मादी गट –**

१) देवणी मादी १ वर्षाखालील वासरे गट
२) देवणी मादी एक वर्षावरील वासरे गट
३) देवणी मादी गाभण कालवड गट
४) देवणी मादी गाभण गाय गट
४) देवणी मादी दुधाळ गाय दुधाळ गट

**लालकंधारी नर गट –**

१) लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे गट
२) लालकंधारी नर १ वर्षावरील अदात गट
३) लालकंधारी नर २ दात वळू गट
४) लालकंधारी नर ४ दात वळू गट
५) लालकंधारी नर ६ दात वळू गट

**लालकंधारी मादी गट –**

१) लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे गट
२) लालकंधारी नर एक वर्षावरील अदात गट
३) लालकंधारी मादी गाभण कालवड गट
४) लालकंधारी मादी गाभण गाय गट
५) लालकंधारी मादी दुधाळ गाय गट

**संकरित मादी गट –**

१) संकरित मादी १ वर्षाखालील वासरे गट
२) संकरीत मादी एक वर्षाखाली वासरे गट
३) संकरित मादी गाभण कालवड गट
४) संकरित मादी दुधाळ गाय गट

**उस्मानाबादी शेळी गट–**

तीन व त्यावरील पिल्लांची शेळी

अश्व नर गट व मादी गट , अदात, दोन दात वरील,

**कुक्कुट गट –**

१) देशी कोंबडी गट
२) विदेशी कोंबडी गट

**श्वान गट –**

वर्गवारी निहाय

## विद्यार्थ्यांनी घेतल्या तासिका; प्राचार्य, प्राध्यापक बनले विद्यार्थी! दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :**दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात आणि अभिनव पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत विविध विषयांच्या तासिका घेतल्या, तर प्राचार्य आणि प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत सहभागी झाल्याने महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या दिनाला आणखीन रोमांचक बनविण्यासाठी स्वयंशासन दिनाचे प्राचार्य यांच्याकडे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी मोर्चा काढत गमतीशीर मागण्या मांडल्या.

स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव मिळाला. वर्गात उभे राहून विषय मांडताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य आणि जबाबदारीची जाणीव दाखवून दिली. प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य तथा 'उत्कर्ष २०२६' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, तसेच समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

उत्कर्ष २०२६ चा जल्लोष...

सध्या महाविद्यालयात 'उत्कर्ष २०२६' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानिमित्ताने विविध शैक्षणिक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविद्यालयीन परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. स्वयंशासन दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि संघभावना विकसित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. २३ मार्चला स्नेहसंमेलनाचे उदघाटन होणार आहे तर २५ तारखेला समारोप होईल.




## देऊळवाडी येथे ३९२ रुग्णांची तपासणी, ४९ जणांचे रक्तदान; आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**उदगीर(प्रतिनिधी):** उदगीर तालुक्यातील आदर्श गाव देऊळवाडी येथे श्री समर्थ सद्गुरू धोंडूतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले.




या शिबिराच्या अध्यक्षस्थानी एकनाथ केदार यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून खुलताबादचे तहसीलदार संतोष गुट्टे, वैजापूरचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे यांची उपस्थिती होती. तसेच देऊळवाडी गावचे सरपंच शुभम केंद्रे व उपसरपंच संतोष केंद्रे यांचीही उपस्थिती होती. कै.त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर यांच्या वतीने आयोजित या शिबिराला ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात एकूण ३९७ रुग्णांची तपासणी, तर ४९ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.ङ्गशिबिरात डॉ. विजय बिराजदार, डॉ. राधिका बिराजदार, डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. उबेद शेख, डॉ. वसंत बलांडे, डॉ. महादेव मठपती लायन्स क्लबचे वैद्यकीय अधिकारी यांनी नागरिकांची तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराची प्रस्तावना प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष संजय राजुळे यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास केदार यांनी केले. याप्रसंगी मोहन गडीकर, शेषराव फड ,वीरभद्र गोगे गणराज केंद्र विलास गताटे दत्ता गुट्टे, व समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखंड हरिनाम सप्ताह समिती, देऊळवाडी तसेच ग्रामपंचायत कार्यालय यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे गावात आरोग्याबाबत जनजागृती होऊन सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तीन दिवसांत दुसऱ्यांदा गारपीट



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- धाराशिव, उमरगा, लोहारा हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदानुसार मागील तीन दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात गारपीट, मध्यम स्वरुपाचा पाऊस पडत आहे. पहिल्या दिवशी लोहारा, उमरगा, तुळजापूर तालुक्यात गारपीट होऊन सुमारे १५०९ हेक्टर पिकांना तडाखा बसला. या नुकसानीचे पंचनामे सुरू असतानाच गुरुवारी दुपारी सुमारास लोहारा तालुक्यातील सास्तूर व वाशी तालुक्यातील विजोरा या गावांत गारपीट झाली. यात केळी,ज्वारी, गव्हू, करडई व आंब्याचे नुकसान झाले. तर जिल्ह्यात सर्वदूर तुरळक स्वरुपाचा पाऊस झाला. ढगांचा गडगडाट, सोसाट्याचा वारा वाहिल्याने काढणीला आलेली उभी पिके भुईसपाट झाली आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. दरम्यान आणखी तीन दिवस कुठे गारपीट तर कुठे मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबईच्या प्रादेशिक हवामान विभागाने मागील तीन दिवसांपासून पावसाची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार बुधवारी विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह लोहारा, उमरगा व तुळजापूर तालुक्यात गारपीट झाली. या गारपिटीने काढणीला आलेले द्राक्ष,केळी, कलिंगड, आंबा, ज्वारी, गहू पिकांचे अतोनात नुकसान झाले. कृषी विभागाने केलेल्या पाहणीत तीन तालुक्यातील सुमारे १५०९.९० हेक्टवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या नुकसानीचे पंचनामे सुरु असताना तिसऱ्या दिवशी वातावरणात बदल होवून लोहारा, वाशी तालुक्यात गारपीट झाली आहे. तर इतर सहा तालुक्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. या पावसाने केळी, आंबा पिकांचे नुकसान झाले.

पूर्वीचे गरम वारे आणि आलेले थंड वारे या कारणाने गार तयार होते. काही भागातच गारपीट होते. अशा वातावरणाने ढगात गारा तयार होतात.अगोदरवच उष्ण वातावरण असताना ज्या ठिकाणी थंडी अधिक आहे. त्याच ठिकाणात आकाशात गार तयार होते, असे हवामान तज्ञ डॉ. शेख महमंद बाबर यांनी सांगितले.

गुरुवारी दिवसभर ऊन-सावल्याचा खेळ सुरू होता. दुपारपासून वातावरणात अचानक बदल झाला. ढगांचा गडगडाट सुरू झाला. लोहारा तालुक्यातील सास्तूर व वाशी तालुक्यातील विजोरासह परिसरात गारपीट झाली. या गारपिटीचा मोठा फटका पिकांना बसला आहे. आंब्याच्या कैऱ्याचा सडा पडला पडला. केळीची पिके मोडून पडली. तर ज्वारीचे पिके आडवी झाली आहेत. जिल्ह्यातील उर्वरित भागात तुरळक स्वरुपाचा पाऊस झाला. तर काही ठिकाणी पाऊस सुरुच होता. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने अद्याप जमिनीतील ओलावा कमी झालेला नसताना पुन्हा पाऊस झाल्याने शेतीत जात येत नसल्याची स्थिती शेतकरी सांगतोहेत.

मागील दोन उन्हाळ्यात मे महिन्यात गारपीट व मुसळधार पाऊस झाला. वादळी वाऱ्याने फळबागांना मोठा फटका बसला. यंदा मात्र मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून गारपीट व अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. उन्हाळ्यात पडत असलेल्या पावसाने पावसाळी वातावरण तयार होत आहे. कमी दाबाचा पट्टा आणि पाऊस हे सातत्याने सुरु आहे.

# ग्रामपंचायत पोटनिवडणुक प्रक्रिया सुरू ; आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी गटविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती

धाराशिव (जिमाका) -सचिव,राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी वाचा अन्वये दिलेल्या आदेशानुसार ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा,अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणुका पारंपरिक पद्धतीने राबविण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.त्यानुसार संबंधित तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील सदस्य/थेट सरपंच पदांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली असून,या निवडणुकीचा कार्यक्रम व संबंधित ग्रामपंचायतींची यादी ई-मेलद्वारे पाठविण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणूक संदर्भातील आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आचारसंहिता प्रमुख म्हणून संबंधित गटविकास अधिकाऱ्यांची पंचायत समिती स्तरावर नियुक्ती करण्यात आली आहे.या अधिकाऱ्यांमार्फत निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व शिस्त राखण्यावर भर दिला जाणार आहे. तालुकानिहाय नियुक्त गटविकास अधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. धाराशिव - गटविकास अधिकारी, पंचायत समिती,धाराशिव; तुळजापूर - गटविकास अधिकारी,पंचायत समिती,तुळजापूर; उमरगा - गटविकास अधिकारी,पंचायत समिती,उमरगा; लोहारा -गटविकास अधिकारी,पंचायत समिती,लोहारा; कळंब - गटविकास अधिकारी, पंचायत समिती,कळंब हे आहेत.

वरीलप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांमध्ये आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.तसेच राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देश व आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करावी,असे निर्देशही देण्यात आले आहेत.

# बेपत्ता मुलाचा मृतदेह शेततळ्यात आढळला :१४ मार्च रोजी घरातून अचानक बेपत्ता झाला

कळंब, ीं तालुक्यातील भाटशिरपुरा येथून तीन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या १३ वर्षीय मुलाचा मृतदेह मंगळवारी शेततळ्याच्या पाण्यावर तरंगताना आढळून आला. करणकुमार बबलू राय असे या मृत मुलाचे नाव आहे. ऊसाच्या फडात आढळला वृद्धाचा जळालेला मृतदेह

मूळचे दुधैला (जि. पाटणा, बिहार) येथील रहिवासी असलेले बबलू रामभवन राय हे गेल्या सात महिन्यांपासून भाटशिरपुरा येथे सहकुटुंब वास्तव्यास आहेत. त्यांचा १३ वर्षाचा मुलगा करणकुमार हा १४ मार्च रोजी घरातून अचानक बेपत्ता झाला होता. सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती.

१७ मार्च रोजी सकाळी शेतातील एक कामगार मोटार चालू करण्यासाठी शेततळ्याजवळ गेला असता, त्याला पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसला त्यांनी तातडीने ही माहिती गावकरी व शिराढोण पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शहानिशा केली असता सदर मृतदेह बेपत्ता असलेल्य करणकुमारचाच असल्याचे निष्पन झाले. शेततळ्याच्या गेटजवळ मुलाची चप्पल आणि तळ्याच्या काठावर टी-शर्ट व पॅन्ट आढळून आली आहे. डॉक्टरांनी घटनास्थळीच शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात दिला. त्यानंतर शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तपास पोलिस उपनिरीक्षक परमेश्वर पवार हे करत आहेत. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१९ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १८१ कारवाया करुन १,३८,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


# ज्येष्ठ नागरिक मालोजी निंबाळकर यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार

धाराशिव (प्रतिनिधी)- शहरातील जुन्या पिढीतील वतनदार तसेच ज्येष्ठ नागरिक मालोजी निंबाळकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिष्टचिंतन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निंबाळकर गल्ली येथील त्यांच्या स्वगृही आयोजित कार्यक्रमात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी समाजातील ज्येष्ठांचा सन्मान ही आपली संस्कृती असून त्यांच्या अनुभवातून नव्या पिढीला प्रेरणा मिळते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमात मार्गदर्शक धनंजय शिंगाडे, अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, कार्याध्यक्ष सुधीर पवार, ड. परवेझ काझी, ईलियास मुजावर, नंदकुमार शेटे,डॉ.विजय शिंदे,अमोल नायकल,कुणाल निंबाळकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मालोजी निंबाळकर यांना निरोगी व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# सांजा गावात रेल्वे ब्लास्टिंगमुळे घरांना तडे; युवासेना तालुका प्रमुख राकेश सूर्यवंशी यांच्या पाठपुराव्याला यश

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील सांजा गावाजवळ सुरू असलेल्या सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंग होत असून, त्यामुळे परिसरातील घरांना तडे जाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.या प्रकरणी युवासेना तालुका प्रमुख राकेश सूर्यवंशी यांनी तातडीने पुढाकार घेत प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून प्रश्न लावून धरला. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागाला सांजा गावाजवळील ब्लास्टिंग तात्काळ थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच, ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कामकाजाची पद्धत बदलण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, या प्रकरणात विलंब होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असून, ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.


मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
ATVM सुविधा सहाय्यक
सूचना क्रमांक: SUR/C/Cog/ATVM/Facilitator/I/2025 दिनांक: १८.०३.२०२६
वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक मध्य रेल्वेच्या सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर विभागातील १३ स्थानकांवर ATVM सुविधा सहाय्यकांच्या निवडीसाठी अर्ज आमंत्रित करत आहेत. सविस्तर माहिती http://www.cr.indianrailways.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर - ४१३००१ येथे संपर्क साधावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १७.०४.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत आहे.
वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक
DE/Sur-14 मध्य रेल्वे, सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



HIGH-POWERED SALE COMMITTEE
(CONSTITUTED BY THE HON'BLE SUPREME COURT OF INDIA)
Office Address: 4th Floor, Plot No. 226, A-2, Sector-17, Dwarka, New Delhi-110075 Telephone-011-40073576

PUBLIC NOTICE

NOTICE OF SALE FOR E-AUCTION OF IMMOVABLE PROPERTIES OF SAI PRASAD GROUP OF COMPANIES

1. The High-Powered Sale Committee has been constituted by the Hon'ble Supreme Court of India vide order dated 15 July 2024 passed in Writ Petition (Crl) No.546 of 2023 in the matter of Balasaheb Keshawrao Bhapkar & Ors. Vs Securities and Exchange Board of India.

The Committee has been constituted to liquidate the assets of Sai Prasad Group of companies in line with directions of the Supreme Court vide order dated 19.02.2025 (para 5 (iii) by way of e-auction of 46 properties in Maharashtra (1 in Mumbai, 2 in Nashik, 35 in Osmanabad / Dharashiv, 6 in Pune & 2 in Thane) and 1 property in Jharkhand (Ranchi) and consequently issued Request for Proposals (RFP) which can be accessed along with property documents at:

www.bankeauctionwizard.com
www.hpsc-saiprasad.com

2. Details for participation in e-auction are available in RFP. Key dates of RFP are as follows:

- Date of Publication of RFP - 25th March, 2026
- Bid Due Date and Time for RFP - 15th April 2026 till 4.00 PM
- Start Date/Time of e-Auction - 30th April, 2026 at 11.00 AM

APPLICABLE CONDITIONS:

3. All properties will be sold on an "as is, where is, whatever there is" basis and the purchaser will be responsible for all claims, liabilities and/or encumbrances relating thereto.

4. The details of the Properties as stated in this Notice and the RFP under this Tender Document are as per the details made available to the Seller and neither the Seller nor the Agency shall, in any way, be responsible for any variation in the extent of the Properties due to any reason.

5. The committee will in no manner be responsible for any discrepancy in the properties/their title deeds and bidders are requested to submit their bids only after conducting their own independent due diligence exercise with respect to the title to the properties.

6. The interested bidders, who require assistance may contact on email id: hpsc.saiprasad@stockholdingdms.com or Ms. Snehal Patil, Deputy Manager, StockHolding DMS 022-61778742

CBC 15204/11/0270/2526


# महावितरणच्या दारात उभारली स्मार्ट मीटरची गुढी कनेक्शन तोडल्याने कळंबमध्ये आंदोलन.......

कळंब, (प्रतिनिधी)- दहावी बोर्ड परीक्षा सुरू असतानाच महावितरण कंपनीने कळंब शहरासह तालुक्यातील सुमारे ४५०० ग्राहकांचा वीजपुरवठा बंद केल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी महावितरणच्या कार्यालयासमोर स्मार्ट मीटरची गुढी उभारून अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला.

यापूर्वीही मुळे यांनी होळीच्या दिवशी वीज बिलांची होळी करत आंदोलन केले होते. त्यानंतर त्यांनी महावितरणकडे तक्रार अर्ज दाखल करून काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. कळंब शहरातील एकूण घरगुती वीज ग्राहकांची संख्या किती, त्यापैकी किती ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात आले, तसेच स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी संबंधित ग्राहकांची पूर्व परवानगी घेण्यात आली होती का, याबाबत त्यांनी खुलासा मागितला होता. तसेच स्मार्ट मीटरधारक ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी थकबाकीबाबत कोणती सूचना देण्यात आली होती का, आणि ऑटो डिस्कनेक्ट प्रणालीद्वारे वीजपुरवठा बंद होणार असल्याची माहिती ग्राहकांना देण्यात आली होती का, याचाही लेखी खुलासा करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, या सर्व प्रश्नांवर महावितरणकडून कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आला नसल्याचा आरोप करत मुळे यांनी हे आंदोलन छेडले. ग्राहकांची पिळवणूक करून आर्थिक लूट सुरू आहे, असा आरोप करत त्यांनी गुढीपाडव्याच्या दिवशीच स्मार्ट मीटरची गुढी उभारून प्रशासनाचा निषेध केला. या आंदोलनामुळे कळंब शहरात स्मार्ट मीटर, वीजपुरवठा खंडित होणे आणि महावितरणच्या कारभाराबाबत पुन्हा एकदा चर्चा रंगली असून, नागरिकांकडूनही याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करण्याची मागणी होत आहे.


मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
सिग्नलींगची कामे
डीआरएम (ST) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम आणि प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **निविदा क्रमांक:** SUR-N-T-2025-26-46, **कामाचे नाव आणि ठिकाण:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जिओग्रिड आणि जिओ-टेक्स्टाइल पद्धतीचा वापर करून BCM कामाशी संबंधित सिग्नलिंगचे काम (TFTR आणि TBR). **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ८२,६८,७१३.८४, **निविदा अर्जाची किंमत:** शून्य, **जमा करावयाची अनामत रक्कम:** रु. १,६५,४००/-, **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने, **निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** १७.०४.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेमध्ये काही सुधारणा/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम (EMD) भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा बँक गॅरंटी या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तसेच, बँक गॅरंटीच्या मूळ प्रतीची निविदा सादर करण्याच्या अंतिम तारीख संपण्यापूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून), निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नियुक्त अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जाऊन सुपूर्द करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.
विभागीय रेल्वे व्यवस्थापक
DE/Sur-13 मध्य रेल्वे, सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
सिग्नलींगची कामे
डीआरएम (ST) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in येथे ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **निविदा क्रमांक:** SUR-N-T-2025-26-44, **कामाचे नाव व ठिकाण:** सोलापूर विभागातील ताजसुल्तानपूर आणि धाराशिव स्थानकांवर माल गोदामांच्या विकासाशी संबंधित ST (सिग्नलींग व दूरसंचार) ची कामे., **कामाचा अंदाजित खर्च:** रु. ७९,६४,९२७.१८, **निविदा अर्जाची किंमत:** शून्य, **जमा करावयाची अनामत रक्कम:** रु. १,५९,३००/-, **कामाचा पूर्तता कालावधी:** १२ महिने., **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** १०.०४.२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. कामाचा सविस्तर तपशील ireps संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही शुद्धीपत्रके/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-खरेदी संकेतस्थळावरच अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. प्रत्यक्ष/टपालाद्वारे/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीच्या नावाने वर्ग-३ डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in या संकेतस्थळावर करावी. अनामत रक्कम भरण्यासाठी नेट बँकिंग, पेमेंट गेटवे किंवा मबँक गॅरंटीफ या पर्यायांचा स्वीकार केला जाईल; तथापि, बँक गॅरंटीच्या मूळ प्रतीची निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच, निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाचा अपवाद वगळून) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष सुपूर्द करणे आवश्यक आहे. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.
विभागीय रेल्वे व्यवस्थापक
DE/Sur-12 मध्य रेल्वे, सोलापूर
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649